माणूस
बुधवार
३ मार्च १९७१
चाळीस पैसे



खान मोहंमद असगर हुसेन

अकोला



मोतीरामजी लहाने

# दमदार विरोध

नासिक



आण्णासाहेब कवडे



धैर्यशीलराव पवार

बुधवार ३ मार्च १९७१

# माणूस

| | | |
|---|---|---|
| वर्ष : दहावे | संपादक | सहाय्यक |
| अंक : सहासष्टावा | श्री. ग. माजगावकर | दिलीप माजगावकर |
| | | सौ. निर्मला पुरंदरे |
| किंमत | वार्षिक वर्गणी | परदेशची वर्गणी |
| चाळीस पैसे | तीस रुपये | साठ रुपये |


## सप्रेम नमस्कार....

□ शनिवार ६ फेब्रुवारी ७१ चा अंक वाचला. बबन डिसोझा व मधू पानवलकर यांनी कै. नाथ पै यांच्या काही आठवणी दिल्या त्याबद्दल मी त्यांचा अत्यंत ऋणी आहे. मी माझ्या सीमाबांधवांच्या वतीने त्यांचे आभार मानीत आहे.

पण त्यांनी ज्या आठवणी दिल्या आहेत त्यापैकी पान ३ वरील शेवटच्या परिच्छेदात काही भाग चुकीचा दिला गेला आहे. नाथ पैंना भाई ताराचंद व मी परिचयाचे होतो. ज्याअर्थी नावाचा उल्लेख आठवणी देणाऱ्यांनी केला नाही त्याअर्थी त्यांना संपूर्ण आठवण माहिती नाही.

भाई ताराचंद शहा, माझे मित्र गुलाबराव देशमुख व मी असे तिघे मिळून दिल्लीस गेलो होतो. आमचा कार्यक्रम ठरलेला होता. पण लोकसभेला दोन दिवस सुटी होती. या सुटीत आम्ही सत्तारूढ व विरोधी खासदारांच्या भेटी घेतल्या. गृहमंत्री यशवंतराव यांचीही भेट घेतली; आणि तदनंतर आम्ही नाथ पैंना भेटीकरिता

द्विसाप्ताहिक माणूस : १०२५ सदाशिव, पुणे ३० : दूरध्वनी : ५७३५१

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' द्विसाप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

फोन केला. त्यांचा येण्याबद्दल फोन आला.

आम्ही तिघेही लागलीच त्यांच्या घरी गेलो. त्यांच्या पत्नींनी नाथ पै फार आजारी असल्याचे सांगितले व आम्हाला पाचच मिनिटे भेट घेण्याकरिता दिली.

आम्ही आत गेलो. नाथ पै बिछान्यावर पडले होते. आमची चाहूल लागताच त्यांना उठवत नव्हते, तरीपण उठून आमचे त्यांनी स्वागत केले. सामान्य व्यक्तींकरिता देखील त्यांच्या ठिकाणी आदरभाव वसत होता.

सीमाप्रश्नाविषयी आमची चर्चा सुरू होती आणि ५ मिनिटे झाल्यावर त्यांच्या पत्नी आम्हाला सूचना देण्याकरिता आल्या. लगेच नाथ पै आपल्या पत्नीस उद्देशून म्हणाले,

'Go and prepare tea. These are my brothers and they have come from a long distance.'

हा पहा सामान्य माणसाबद्दल असलेला त्यांचा जिव्हाळा.

आणि नाथ पै चांगले अडीच तास बोलत बसले. आम्ही त्यांना विश्रांती घेण्याची विनंती वारंवार केली; पण ते बोलत राहिले.

त्यांनी सीमाप्रश्नाबद्दल जे कार्य केले त्याचा सर्व आढावा व लेखी पुरावा सादर करून सीमाप्रश्नाबद्दल अहोरात्र झटणारे एक थोर सीमाबांधव हे कृतीने त्यांनी सिद्ध करून दाखविले.

आम्ही लोकसभेत पत्रके फेकली म्हणून आम्हाला आठ दिवसांची शिक्षा झाली. नाथ पैंनी स्ट्रेचरवरून लोकसभेत जाऊन ठराव केला व आमची शिक्षा २ दिवसांनी कमी केली. आयुष्यभर म्हैसूरच्या बंदीवासापेक्षा कायम बंदीवासात रहावे असे वाटते; आणि हीच भावना त्या वेळीही होती; आजही आहे.

शिक्षेला आम्ही भीत नव्हतो. आम्ही भीत होतो नाथ पैंच्या आजाराबद्दल. अर्थात आम्ही न भेटल्यामुळे ते अस्वस्थ झाले असतील म्हणून आम्ही त्यांना पत्र लिहिले. नाथ पैंना पुन्हा भेटणे म्हणजे ते पुन्हा बोलत बसणार. डॉक्टरांनी त्यांना बोलू नका असा सल्ला दिला होता. पण सीमाप्रश्न म्हटले की ते स्वस्थ बसत नव्हते. बेळगावला पण हेच घडले. त्यांनी डॉक्टरांचा सल्ला मानला नाही. याची दुःखद फळे आज सीमाबांधवांना भोगावी लागणार आहेत.

२२ फेब्रुवारी, १९७१ पाटील के. पी., कोल्हापूर.

□ जीवनाच्या विविध अंगांचा रोचक, रंजक नि अभ्यासपूर्ण परामर्ष घेणारा 'माणूस' मला स्वतःला नि आमच्या घरातील सर्वांनाच आवडतो; विज्ञानेश्वरी, दिल्ली, कलकत्ता, गोवा, गुजरात येथील वार्तापत्रे, सांस्कृतिक मुंबई, नाट्यसंगीत, क्रीडा या संबंधातील लेख, तसेच विविध चालू महत्त्वपूर्ण घटनांवरील लेख वाचल्यावर आपणास भेटणाऱ्या आपल्या स्नेह्यासोबत्यांस आवर्जून 'वाच' म्हणून सांगावे

असे असतात. 'माणूस'ने चांगली माणसे घडविण्याचे जे कार्य चालविले आहे त्याचे कौतुक वाटते, आनंद वाटतो. त्याचबरोबर 'माणूस'च्या गेल्या काही अंकांपासून खटकत असलेल्या, डाचत असलेल्या एका गोष्टीचा उल्लेख केल्यावाचून राहवत नाही.

विविध आवडीनिवडीच्या वाचकांना हवासा वाटावा असा अंक काढायला हवा हेच मान्य करूनही आपण आपल्या कथा या सदरात ज्या तऱ्हेच्या कथा आम्हास वाचावयास देत आहात त्याबद्दलची नापसंती व्यक्त करणे मी आवश्यक समजतो. विशेषत: २४ फेब्रुवारीच्या अंकातील 'एका फुलाची गोष्ट' ही कथा कोठल्या पातळीच्या वाचकांसाठी आहे? कोणाचाही उल्लेख न करताही असे म्हणता येईल की अशा कथांसाठी अन्य विपुल मासिके आहेत. आपण 'माणूस'ची जी प्रतिमा समाजमानसात रेखली आहे ती डागाळू नये ही अपेक्षा.

२४ फेब्रुवारी, १९७१ वसंत देसाई, पुणे.

□ □ □

# आदर्श मतदान

मतदारांनी कोणत्याही पक्षाशी किंवा त्याच्या भांडणाशी एकरूप होऊ नये. त्यांनी उमेदवाराचे पक्ष विचारात न घेता त्यांची मते विचारात घ्यावीत. त्यांच्या मतापेक्षाही त्यांचे चारित्र्य महत्त्वाचे वाटावे. चारित्र्यसंपन्न मनुष्यच त्याला दिलेल्या कोणत्याहीं पदाला लायक बनू शकेल. चारित्र्यहीन मनुष्याच्या हातून वरच्या दर्जाची सेवा घडणें अशक्य आहे.

जर मी मतदार असेन तर उमेदवारांच्या यादीतून अगोदर चारित्र्यसंपन्न माणसे निवडीन आणि मग त्यांची मते समजून घेईन. देशापुढें आणि समाजापुढें असणाऱ्या जिव्हाळ्याच्या प्रश्नांसंबंधी मी त्यांना पृच्छा करीन आणि माझें समाधान झाले तर मतदान करीन.

आपल्या पसंतीचा उमेदवार मतदारांना आजच्या उमेदवारातून आढळला नाही तर त्यांनी मते नोंदवू नयेंत. अशा वेळी मतदान न करणे हेच मतदान करण्यासारखें आहे.

—महात्मा गांधी

# दिल्ली वार्ता

**छोटेबाबू**

## घबराट

या नक्षलवादी लोकांच्या हालचाली काही लक्षातच येत नाहीत. वास्तविक दिल्ली हा भाग काही त्यांना तसा 'फॉर' नाही. गेली एकदोन वर्षे या लोकांनी महाविद्यालये व विद्यापीठातील तरुणांना फितविण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. पोलिसांच्या दक्षतेने म्हणा, जनसंघ किंवा दुसऱ्या पक्षांच्या युवक-विद्यार्थी संघटनेच्या विरोधामुळे म्हणा तो काही फारसा यशस्वी होत असलेला दिसत नाही. पण पश्चिम बंगालमधील अनाचाराच्या, खुनांच्या बातम्यामुळे राजधानीतील लोकही थरासे साशंक असतात खरे.

गेल्या आठवड्यात असाच प्रकार झाला. मुला-मुलींच्या शाळांच्या चालकांना धमकीची पत्रे आली. शाळकरी मुलांना पळविणार असल्याची अफवाही लगेच शहरात पसरली. पोलिसांनी बंदोबस्त वाढविला, शाळांभोवती साध्या वेशातले पोलीस ठेवले. अफवा खोटचा असल्याचे वारंवार जीव तोडून सांगितले तेव्हा थोडं स्थिरस्थावर झाल्यासारखं वाटलं.

पण दोन दिवसांनीच एका कन्याशाळेजवळ एक इसम संशयास्पद स्थितीत फिरताना दिसला. पुनः घबराट. मग दोघातिघांनी त्याला हटकले. तो काही सांगायलाच तयार नव्हता–कारण स्वा ी तर्र होती! नक्षलवाद म्हणजे काय याचे ज्ञानही त्याला नसावे!

एक मात्र खरे की काही गोष्टी खरोखरीच गूढ आहेत. उदाहरणार्थ, गेल्या वर्षी येथील एका कॉलेजची तरुणी कलकत्त्याला वडिलांना भेटायला जाते सांगून होस्टेलबाहेर पडली तो तिचा अजून पत्ता नाही. नक्षलवादी हालचाल करण्याच्या संदर्भात तिचं नाव पोलिसांच्या यादीत होतं, म्हणून या घटनेला जास्त महत्त्व. दिल्लीतील तरुण-तरुणींत नक्षलवाद पसरविण्यासाठी 'हाय कमांड'कडून तिची नेमणूक झाली होती, अशी बोलवा!

## घरमालकांना त्रास

निवडणुकीच्या प्रचारासाठी सर्वपक्षीय उमेदवारांनी आचारसंहिता करावी ही कल्पना गेल्या जानेवारीत पुढे आली तेव्हा दिल्लीत सर्वांनी माना डोलावल्या.

पण नेहमीप्रमाणे ही आचारसंहिता कुठे अडगळीत जाऊन पडली कुणास ठाऊक.

जनसंघ, सत्तारूढ काँग्रेसपक्ष सर्व पक्षांचे व अपक्ष उमेदवारही कुठलाही विधि-निषेध मानायला तयार नाहीत, असे दिसते. गेल्या आठवड्यात एका दुकानावर मालकाने आपल्या पक्षाचे ध्वज आणि पोस्टर्स लावले. स्थानिक दादा लोकांनी त्याला ते काढून आपले ध्वज लावायला सांगितले, त्यातून अगदी कोणत्याही खेड्यात असमंजस लोक भांडतात, शिवीगाळ करतात तसे दृश्य देशाच्या राजधानीत दिसले.

हा केवळ एक प्रकार नाही. सकाळ-संध्याकाळ, दुपारी जेवणाच्या सुटीत कुठे न कुठे सभा चालू असते. विरोधी पक्षाचे पाठीराखे मग तिथे येऊन घोषणा देतात, सभा उधळायचा प्रयत्न करतात. कुणाही एका पक्षाला दोष देऊन फायदा नाही. सर्वच तसे करताना दिसतात.

भिंतीवरच्या पोस्टर्सचे तसेच. एकाने लावलेले पोस्टर काढून त्या जागी आपले लावायचे असा सपाटा रात्रीतून उरकण्यात येतो.

मागे शिवसेनेने मुंबईत एक घोषणा केली होती असे आठवते. निवडणूक संपताच सर्व पोस्टर्स काढून टाकू, रंगविलेल्या भिंती साफ करू असे काहीसे आश्वासन त्यात होते. प्रत्यक्षात नंतर काय झाले ते माहीत नाही. पण ती कल्पना खरोखरच छान होती. सर्वसाधारणपणे सर्वच घरमालक या निवडणूक युद्धामुळे त्रासून गेलेले दिसतात.

## फसवणूक – उच्च स्तरावर

राजधानीत फसवेगिरी आणि तीही अगदी उच्च स्तरावर, पद्धतशीरपणे कशी चालते, याचा एक नमुना.

मुंबई, कलकत्ता, मद्रास, दिल्ली अशा शहरांतून अधूनमधून निरनिराळ्या व्यापारी कंपन्या किंवा इतर संस्थांतर्फे सौंदर्यस्पर्धा आयोजित करतात. त्यांची अफाट लोकप्रियता आणि तारुण्यात पदार्पण करणाऱ्या तरुणींची अर्धावृत शरीरे बघण्याची विकृत लालसा यांचा फायदा घेण्याचे ठरवूनच बहुधा गेल्या शनिवारी एखादा बडा फिल्म अभिनेता एक जज्ज म्हणून आणण्याचा प्रयत्न करीत आहेत असेही जाहीर झाले होते. तिकिटांचा दर होता, फक्त पन्नास रुपये. यात खाणे-पिणेही होते.

शनिवारी सुमारे सातशे लोक 'सौंदर्य' पाहण्यासाठी ही महागडी तिकिटे काढून नवी दिल्ली हॉटेलमध्ये जमले. दोन तास झाले तरी काहीच हालचाल दिसेना. तेव्हा गडबड होऊ लागली. घाईघाईने त्यांना खाऊ घालण्यात आले. पण त्यांनी तेवढ्यासाठी पन्नास रुपये दिले नव्हते. गोंधळ वाढला, तसे संयोजकांपैकी

एकाने काही गुंड गोंधळ घालत असल्याचे जाहीर केले. पोलिसांना बोलाविण्यात आले. खेळ संपला होता.

लोकांच्या विकृत वासनांच्या कमकुवतपणाचा असा फायदा घेऊन फसविण्याची या संयोजकांची पहिलीच वेळ नव्हती म्हणतात. कलकत्त्यालाही अनेक लोकांना त्यांनी असेच उपाशी पाठविले होते.

## पडद्यामागची हकीकत

१६ फेब्रुवारीला रात्री किशनगढच्या महाराजांचा खून झाला, तेव्हा तो राजकीय असल्याचा भास अनेक पक्षांच्या कार्यकर्त्यांनी निर्माण केला. वर्तमानपत्रांनीही भरपूर प्रसिद्धी दिली. पण आता या मागचे खरे कारण उजेडात आले तेव्हा निदान दिल्लीच्या तरी सर्व वर्तमानपत्रांत सर्व खुलासा आलेला दिसला नाही. 'हिंदुस्थान टाईम्स'चा बातमीदार मात्र जयपूरहून कळवितो ती हकीकत अशी आहे :

सेहेचाळीस वर्षांच्या या माजी संस्थानिकाचे एका घटस्फोटित तरुणीबरोबर अनैतिक संबंध होते. या तरुणीच्या कुटुंबाला त्यांनी आपल्या शेताजवळ घर दिले होते. शेताची देखभाल तरुणीचा मोठा भाऊ भीमा जाट याच्यावर सोपविली होती. भीमाच्या कॉलेज शिक्षणाचा खर्चही महाराज करीत होते. अलीकडेच त्यांनी हे शेत त्याच्या नावावर करून देण्याचे कबूल केले. पण नंतर एका मिल मालकाने शेतातील विहिरीच्या मोबदल्यात भरपूर रक्कम देऊ केल्याने त्यांनी विचार बदलला. त्यामुळे भीमा चिडला.

बहिणीशी महाराजांचा अनैतिक संबंध असल्याने गावकऱ्यांनी आधीच त्याच्या कुटुंबाला वाळीत टाकले होते.

१६ फेब्रुवारीला संध्याकाळी त्याने फोन करून महाराजांना सांगितलं की तुमच्यासाठी एक छोकरी आणली आहे. एकट्यानेच या.

गाडी घेऊन महाराज निघाले. भीमाला गाडीत घेतले. त्याच्या हातात रिव्हॉल्व्हर पाहताच दोघांची झटापट झाली. पण शेवटी भीमाने त्यांच्या उजव्या कानाजवळ गोळी झाडली. गाडीचा वेग कमी होता म्हणून अपघात झाला नाही, ती रस्त्याच्या कडेला येऊन थांबली.

एका बस ड्रायव्हरने भीमाला उतरताना पाहिले. त्याच्या कपड्यांच्या वर्णनावरून तो दोन दिवसांत सापडला. तेव्हा त्याने कबुली दिली.

खरं म्हणजे ही घटना दिल्लीतील नाही. पण हा खून राजकीय होता अशी ओरड कानी आल्यानंतर त्याचे सत्य स्वरूप मात्र पुढे कुणी आणण्याचा प्रयत्न केला नाही. म्हणून ही माहिती दिली. राजे महाराजांचा स्त्रीलंपटपणा, त्यांचे 'जनहिता'च्या नावाखालील राजकारण वगैरे भाष्य मी करीत नाही. □ □ □

मुक्काम पोस्ट : सालेम

# मिरवणूक काढणारा सुटतो छापणारा सापडतो

नलिनी अंबाडे, मद्रास

योगायोग पाहा. २६ जानेवारीला–म्हणजे ज्या दिवशी 'ती' मिरवणूक निघाली त्या दिवशी–– मी मदुरा येथे होते. दुसऱ्या दिवशी कन्याकुमारीस. पुढे ३० रोजी कोईमतूरला. कानावर कुजबुज आली. इतकी खळबळ उडवणाऱ्या त्या मिरवणुकीत होतं तरी काय ? आमचे शंकराचार्यदेखील खडबडून जागे झाले म्हणजे काय ?

सेलम (किंवा सालेम–SALEM) हा तामीळनाडूमधील एकेकाळचा सर्वांत मोठ्ठा जिल्हा. सेलम जिल्ह्याचे ठाणे. तेथे भर बाजारपेठेतून, मोठ्या रस्त्यांवरून अगदी डी. एस. पी. च्या ऑफीसवरून ही मिरवणूक गेली– अगदी जादा पोलीस बंदोबस्तात ! आपल्याकडे लहान गावांत बैलगाडीवर दोन्ही बाजूला जसे सिनेमाचे बोर्डस लावून मिरवीत जाहिरात करतात तशीच ही मिरवणूक होती. पण ती-मधील चित्रांचे वर्णन करण्यापूर्वी, "द्रविड कळघम" पक्षाची विचारसरणी पाहणे आवश्यक आहे.

हा पक्ष ई. व्ही. ए. रामस्वामी नायकर यांनी स्थापला. सध्या त्यांचे वय ९० पेक्षा अधिक आहे. वडीलपणामुळे व अचाट बुद्धिमत्तेमुळे अद्यापही राजाजींसह सर्व नेते मान देतात. पण हा "वाया गेलेला" विद्वान आहे हेच खरं. त्यांची वक्तव्ये पाहा–देवदेवता-पुराणे बोगस आहेत, गीता भंकस आहे. तामीळ राष्ट्रभाषा व्हावी. द्रविड लोक म्हणजेच मूळ भारतीय. गोरे दिसणारे (म्हणजे अय्यर, अयंगार, ब्राह्मण) हे आर्य म्हणजे उपरे–बाहेरचे– त्यांनी बाहेर जावे. इ. इ. अशा

पृष्ठ ५४ वर

# अकोला

## जनसंघ X नवकाँग्रेस लढत

### निकालाचा तराजू मात्र
### शे. का. प. । रिपब्लिकनच्या हातात

माणूस प्रतिनिधी

विदर्भातली एकही जागा विरोधकांना मिळणार नाही असं श्री. वसंतरावांनी ठणकावून सांगितलं आहे. तर नऊपैकी जेमतेम चार जागा काँग्रेसला मिळाल्या तरी त्यांनी नशीब समजावं अशा गर्जना श्री. जांबुवंतराव धोटयांनी चालवल्या आहेत. काही अपक्ष पत्रकारांशी बोलण्याचा अकोल्यात योग आला, तेव्हा त्यांनी पाच-सहा जागांवर अटीतटीची लढत होऊन निदान तीन तरी जागा विरोधकांना मिळतील असा त्यांचा अंदाज असल्याचं सांगितलं. ज्या तीन जागा विरोधकांना हमखास मिळतील असं वाटत आहे त्यात अकोल्याचा अंतर्भाव आहे. ह्याखेरीज भंडारा, चंद्रपूर ह्या जागा विरोधकांना मिळतील आणि नागपूर, वर्धा, यवतमाळ, बुलढाणा ह्या जागांसाठी अटीतटीची लढत होऊन पारडं थोडयाफार मतांनी इकडे किंवा तिकडे झुकेल असं वैदर्भीय निरीक्षकांना वाटतं. अकोला मतदारसंघातून हिंडत असताना ह्या दाव्यात तथ्य असल्याचं जाणवलं, पण त्याबरोबर खुद्द अकोल्याची जागा जी त्यांना अत्यंत खात्रीची वाटत आहे, ती सहजी जिंकणं जनसंघाच्या श्री. मोतीरामजी लहाने ह्यांना कठीण जाणार आहे. अर्थात तूर्तच्या अंदाजानुसार तरी जनसंघाचं पारडं जड आहे. विदर्भात बडया आघाडीची ' विशाल आघाडी ' बनली असून नाग-विदर्भ आंदोलन समिती, रिपब्लिकन पक्षाचा खोब्रागडे गट, फॉरवर्ड ब्लॉक ही मंडळीही ह्या ' विशाल आघाडी 'च्या झेंडयाखाली एकत्रित आली आहेत. अकोला हे नाग-विदर्भ आंदोलनाचं एक महत्त्वाचं केंद्र. श्री. जांबुवंतराव धोटयांच्या सभांनी जनता त्यांच्या मागे असल्याचं दाखवून दिलं आहे, तर विदर्भात रिपब्लिकन पक्षांत खोब्रागडे गट हाच अधिक सामर्थ्यशाली गट आहे.

खुद्द अकोल्यात सुमारे ऐंशी हजार मतदार रिपब्लिकन पक्षाचे असावेत असं मला सांगितलं गेलं. ज्या पद्धतीनं रिपब्लिकन कार्यकर्ते तीन गटांत विभागले गेले आहेत त्याच पद्धतीनं जर मतदान होऊ गेलं तर किमान ६० टक्के रिपब्लिकन मतदार खोब्रागडे गटाच्या पाठीशी असेल.

अर्थात कांग्रेसी गोटातही निराशेचा सूर अजिबात नाही. श्री. मोतीरामजी लह्राने ह्यांच्या उमेदवारीमुळे कांग्रेसला धोका निर्माण झाल्याचं ते मान्य करत असले तरी "चान्सेस निम्मे निम्मे असून, पारडं आमच्या बाजूनं झुकलेलं असेल" असं ते म्हणतात. ठिकठिकाणाप्रमाणे आकडेमोड त्यांच्याही जवळ तयार आहे आणि त्यांचं गणित पाहू गेल्यास, कांग्रेसच निवडून येईल असंच कुणालाही वाटावं. त्यांचे उमेदवार श्री. खान मोहमद असगर हुसेन हे एकतर विसर्जित लोकसभेचे खासदार आहेत. त्याचप्रमाणे अकोला नगरपालिकेत उपाध्यक्ष असून ते जनतेत प्रिय आहेत. गेल्या चारी सार्वत्रिक निवडणुकीतनं कांग्रेसनं इथे प्रचंड विजय मिळवले होते. जिल्हा परिषद, ठिकठिकाणच्या पंचायत समित्या, जिल्हा बँका वगैरेवर कांग्रेसचं निर्विवाद वर्चस्व आहे. जिल्ह्यात दूरवर पसरलेल्या खेड्यापाड्यातनं कांग्रेसचं जाळ पसरलेलं आहे. अन्य पक्ष तिथपर्यंत अद्याप पोहोचही शकलेले नाहीत आणि अर्थातच कांग्रेसी गणितातला शेवटचा आणि महत्त्वाचा मुद्दा म्हणजे श्रीमती इंदिरा गांधींचा जनतेवरील प्रभाव. इंदिराजींच्या अकोल्यातल्या जाहीर सभेनंतर अकोलावासीयांवर एक आगळी छाप पडली आहे आणि त्यातनं फार मोठा बिगर-कांग्रेसी मतदार कांग्रेसकडे झुकला आहे, असा ठाम विश्वास कांग्रेसच्या जिल्हा पदाधिकाऱ्यांनी माझ्याजवळ बोलून दाखवला. ह्या साऱ्या आकडेवारीवर त्यांचं विजयाचं गणित मांडलेलं असलं तरी, कांग्रेस कार्यकर्ते मात्र 'निश्चित विजय आमचाच' असं म्हणताना बिचकताहेत हेही तितकंच खरं.

दोन्ही गोटातनं विजयाची खात्री आढळते पण जनसंघाच्या गोटातनं ती अधिक आढळते. प्रचाराला गती दोन्ही बाजूंनी दिली आहे ठिकठिकाणी— अगदी अंतर भागातनंसुद्धा—भिंती रंगल्या आहेत, प्रचार फलक सर्वत्र झळकत आहेत कर्णे घेऊन जीप्स हिंडत आहेत. छोट्या मोठ्या प्रचार सभांना ऊत आला आहे. विशेष भर खेड्यांतल्या छोट्या छोट्या गट बैठकांवर देण्यात येत आहे. कुणाकडेही साधनांची कमतरता आहे असं भासत नाही. दोन स्थानिक दैनिके, 'मातृभूमि' आणि 'शिवशक्ति' ह्या प्रचार कामाला हातभार लावीत आहेत. नवकांग्रेसतर्फे इंदिराजी, यशवंतराव, वसंतराव आदी नेते येऊन गेले आहेत तर यशवंतराव मोहिते, बाळासाहेब देसाई आदींचे कार्यक्रम जाहीर झाले आहेत. गायकवाड रिपब्लिकन गटानं नवकांग्रेसला पाठिंबा दिला असून त्यांतही श्री. गवई दौरा आटोपून गेले आहेत. विरोधकांनीही श्री. जांबुवंतराव धोटे, श्री. खोब्रागडे, श्री. नानाजी देशमुख आदींच्या प्रचंड सभा घडवून आणल्या आहेत. श्रीमति तारकेश्वरी सिन्हा, श्री. अटल-

बिहारीजी वगैरेंची प्रतिक्षा चालू आहे. ह्याखेरीज, स्थानिक नेत्यांचे छोट्या छोट्या सभांचे फड चालू आहेतच. दोन्ही गटांच्या सभांना लोक गर्दी करताहेत. अगदी मुसलमान मोहल्ल्यातली जनसंघ सभासुद्धा पांचशेचा जमाव खेचते आहे तोही बव्हंशी मुसलमान! तर मध्यवर्ती ठिकाणी श्री. गवईंची प्रचारसभाही तेवढीच गर्दी खेचताना दिसली. ह्या दोन्ही सभांतनं हिंडायची संधि मला मिळाली. दोन्ही सभांतनं हळक्या आवाजातनं चालू असलेल्या काही चर्चाही मला ऐकायला मिळाल्या. त्यातनं एक गोष्ट निश्चितपणे लक्षात आली, की ती म्हणजे प्रचार सभांसाठी जमणाऱ्या जमावांवरून मतदानाचे अंदाज बांधणं चुकीचं ठरणार होतं. नवकाँग्रेसच्या प्रचारार्थ होत असलेल्या श्री. गवईंच्या सभेतल्या निदान पाच सहा जणांनी आपलं मत मोतीरामजींनाच असं निग्रहानं सांगितलं तर, मुसलमान मोहल्ल्यातल्या जनसंघीय सभेसाठी जमलेला बहुसंख्य मुसलमान समाज केवळ हे जनसंघीय म्हणतात तरी काय हे बघण्यासाठी तिथे जमा झाला होता. वक्त्यांच्या कांही मतांशी ते सहमत होतानाही दिसत होते. पण मत मात्र जनसंघाला नाही असं ते उघडपणे बोलत होते. त्यांतही पाच-सहा जण जनसंघाला मत देऊ असं सांगणारे भेटले. नाही असं नाही. काहींनी आपण शे. का. पक्षीय उमेदवार श्री. कराळे ह्यांनाच मत देणार असल्याचं सांगितलं तर उरलेला बहुसंख्य समाज आपली मतं काँग्रेसलाच देणार असं उघड उघड वाटलं.

वर वर पाहता सरळसरळ लढत नवकाँग्रेसचे श्री. खान मोहंमद असगर हुसेन व जनसंघाचे प्रदेशाध्यक्ष श्री. मोतीरामजी लहाने ह्यांच्यात असली तरी, शे. का. पक्षाचे उमेदवार श्री. कराळे ह्यांचाही ह्या निवडणुकीच्या निकालावर प्रभाव पडणार आहे; किंबहुना त्यांना मिळणाऱ्या मतावर निवडणुकीचं भवितव्य अवलंबून राहील असं म्हटल्यास वावगं ठरणार नाही. शे. का. पक्षाचे एकदोन छोटे छोटे बालेकिल्ले ह्या मतदारसंघात आहेत विशेषत: अकोट तालुक्यात त्यांचा प्रभाव मोठा आहे. शिवाय कम्युनिस्टांनी श्री. कराळे ह्यांना पाठिंबा दिला आहे. मुस्लिम लीगही त्यांच्या बाजूने उभी आहे. साहजिकच ह्या निवडणूक समझौत्यांमुळे व शे. का. पक्षाचं जे कार्य अकोट तालुका व त्याच्या परिसरात आहे त्यामुळे, श्री. कराळे ह्यांच्या वैयक्तिक प्रभावामुळे, बरीचशी डाव्या विचारसरणीची मतं शे. का. पक्षाला मिळणार आहेत. त्यांच्याही निवडणूक कचेऱ्यांतून विजयाचं गणित मांडलं जात असलं तरी त्यात काही तथ्य नाही, हे ते स्वत: व त्यांचे कार्यकर्तेही मनोमन जाणतात. त्यांच्या कार्यकर्त्यानं तर मला सरळसरळ सांगितलं, '...ह्या निवडणुकीकडे विजयाच्या दृष्टिकोणातून आम्ही मुळीच बघत नाही. परंतु १९७२ मध्ये अकोला जिल्ह्यातून एकदोन जागा मिळण्याची जी आम्हाला आशा आहे, ती पल्लवीत ठेवण्यासाठीच आम्हाला मतदारांसमोर सतत राहणं आवश्यक आहे. आणि केवळ ह्याच विचारानं आम्ही ह्या रिंगणात उभे आहोत. फल्यूकनी एखादा

अगदी अनपेक्षित घोडाही 'विन'ला येऊ शकतो. तसंच काही झालं तर सांगता येत नाही. पण आमच्या अंदाजाप्रमाणे कराळे किमान चाळीस ते पन्नास हजार मतं तरी निश्चित मिळवतील व त्या जोरावर अकोटची विधानसभेची जागा तरी आम्हाला १९७२ मध्ये हमखास जिंकता येईल...'

शे. का. पक्षाच्या कचेरीतला हा अंदाज कुणीही अवास्तव मानू शकणार नाही आणि श्री. कराळेंना ४०-५० हजार मतं मिळाली तर जनसंघाच्या श्री. लहानेंच्या विजयाच्या दृष्टीनं ती एक महत्त्वपूर्ण बाब ठरेल. श्री. कराळेंना ह्या वेळी पडणारी मतं एरवी कॉंग्रेसला मिळाली ह्यांत काहीच वाद नाही. आणि म्हणूनच शे. का. पक्षाला ह्या निवडणुकीत जेवढी जास्त मतं पडतील तेवढी कॉंग्रेसची डोकेदुखी वाढेल. त्याचा फायदा मात्र वादातीतरीत्या जनसंघाला मिळेल. जनसंघाचं विजयाचं गणित जे इथे निःपक्षरीत्या मांडलं जातं त्यांत महत्त्वाचं स्थान ह्या विशाल आघाडीविरोधी मतांच्या फुटीला दिलं जातं. खुद्द कॉंग्रेसच्या गोटात देखील, यशाबद्दल जी अनिश्चितता निर्माण झाली आहे त्याच्या मुळाशीही शे. का. पक्षाची निवडणुकीतली उमेदवारीच आहे, असं कॉंग्रेस कार्यकर्त्यांना वाटतं. इतरही काही गोष्टी श्री. लहानेंच्या यशाची खात्री वाढवण्यास कारणीभूत ठरणार आहेत. त्यांतलं एक कारण म्हणजे खुद्द श्री. लहाने ह्यांची उमेदवारी हे आहे. वास्तविक जनसंघाच्या मर्यादा, निदान महाराष्ट्रात तरी शहरी मतदारांपुरत्याच मर्यादित आहेत. शिवाय ब्राह्मणांचा पक्ष हे सूत्रही नाही म्हटलं तरी जनमानसांत ठसलं आहे. खुद्द अकोल्यातही परिस्थिती फारशी निराळी नाही. अकोला शहर, इतर काही शहरी विभाग ह्यांच्या परिसरातच जनसंघाचं कार्य आहे; त्याच्या प्रभावाच्या मर्यादा त्यामुळे स्पष्ट आहेत. परंतु जनसंघाच्या ह्या मर्यादांमुळे जो उणीव इतर मतदार संघातनं एरवी भासते, ती इथे श्री. मोतीरामजी लहाने ह्यांनी भरून काढली आहे. अकोला जिल्ह्याच्या सहकारी क्षेत्रात श्री. लहाने आज आघाडीवर आहेत. शिवाय त्यांचा इतरही अनेक सामाजिक-ग्रामीण चळवळींशी जवळून घनिष्ट संबंध आहे. 'पाटील' जमातीतले असल्याने बहुजन समाजातले उमेदवार म्हणूनही त्यांना मान्यता आहे. साहजिकच, जनसंघ अधिक त्यांचा व्यक्तिगत प्रभाव असा दुहेरी फायदा त्यांना मिळाला आहे. जनसंघाचे असतील त्यापेक्षा कितीतरी, मोठ्या प्रमाणात त्यांचे व्यक्तिगत समर्थक त्यांच्या प्रचारार्थ रिंगणात उतरले आहेत. विशेष म्हणजे ह्यापैकी काहींना मी भेटलो असता ते मूलतः कॉंग्रेस, प्रसोपा आदी पक्षांचे सभासदही असल्याचं कधीकधी मला आढळून आलं आहे.

ते पाटील असल्याने त्या जमातीशी हाडवैर असलेल्या कुणबी किंवा असामी जनतेचा पाठिंबा श्री. खान मोहमद असगर हुसेन ह्यांना मिळेल असा एक अंदाज होता. परंतु त्यांपैकी फार मोठी मतं, शे. का. पक्षाला मिळतील असं आता बोलून दाखवलं जात आहे. पाकिस्तानमधल्या विमानजळित प्रकरणाचाही काही प्रभाव

मला आढळला. कित्येक काँग्रेस कार्यकर्त्यांनी मला ह्या संदर्भात सांगितलं की, 'ह्या प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसनं खान मोहंमदांना उभं करून काही निश्चित काँग्रेस-मतं गमावली आहेत.' ह्यांतच काँग्रेस-अंतर्गत लाथाळ्यांचाही काही परिणाम काँग्रेसला भोगावा लागणार आहे. १९७० मध्ये, म्हणजे इंदिराजींनी अविभक्त काँग्रेसमधल्या ज्येष्ठ मंडळींना धाब्यावर बसवून नवकाँग्रेसला जन्म दिल्यानंतर, ह्या मतदारसंघातल्या एका विधानसभा मतदारसंघात पोटनिवडणूक झाली. अकोटमधनं श्री. आबासाहेब खेडकरांच्या मृत्युनंतर झालेल्या पोट-निवडणुकीत नवकाँग्रेसला ही जागा गमवावी लागली. श्री. कोरपे ह्यांना विरोधी आघाडीच्या श्री. तिडक्यांनी पराभूत केलं. नवकाँग्रेसच्या ह्या पराभवाला, विरोधकांच्या संघटित सामर्थ्यापेक्षा आ. पराशर, श्री. असगर हुसेन आदींच्या गट-बाजीच्या कारवायाच अधिक कारणीभूत होत्या असं बहुसंख्य काँग्रेस कार्यकर्त्यांना वाटत आहे. त्यांतले बरेचसे आज एकतर उदास तरी आहेत किंवा अंतःस्थपणे जनसंघाला किंवा 'शेकाप.'ला मदत करताना दिसत आहेत. श्री. सपकाळ, श्री. कोरपे आदींचे श्री. मोतीरामजींबरोबरचे सहकारी क्षेत्रांतले अत्यंत जवळचे संबंधही थोड्याफार प्रमाणात तरी आपला प्रभाव पाडू शकतील.

ह्या एकंदर परिस्थितीमुळेच नवकाँग्रेस गटात थोडीशी खळबळ असून, त्याचं एकंदर प्रतिबिंब श्री. खान मोहमद असगर हुसेन ह्यांच्याशी बोलताना आढळलं. काँग्रेसचा सगळा प्रचार इथेही, काँग्रेसची ध्येय-धोरणं, त्यांची कर्तबगारी किंवा प्रत्यक्ष उमेदवार ह्याऐवजी केवळ श्रीमती गांधींच्या नावावर चालला आहे. ते नाव कशा प्रमाणात जनतेला आकर्षू शकेल त्यावर काँग्रेसच्या पेटीत पडणारी मतं बऱ्याच अंशी अवलंबून राहतील. श्रीमती गांधींच्या काँग्रेसवर पडलेल्या जवळ-जवळ सर्वगामी प्रतिमेसंबंधी मी खानसाहेबांना विचारलं. त्यावर ते म्हणाले, 'लोकशाहीवर आमची श्रद्धा आहे हे निश्चित. तसं नसतं तर श्रीमती गांधी जनतेकडे कौल मागण्यासाठी येत्याच ना. परंतु लोकशाहीतही काही मर्यादा पडतात आणि त्यातही शेवटी जर एखादी व्यक्ती प्रभावी असली तर तिच्याभोवती राजकारण फिरणं हे अपरिहार्यच ठरतं. इंदिराजींभोवती आज असंच राजकारण फिरतंय नि त्यात वावगं असं काहीच नाही. नेहरूंच्या काळात नेहरूंभोवती काँग्रेसचं राजकारण फिरत होतं. आजही जनसंघ म्हणजे बाजपेयी ही भावना आहे. अशी एखादी समर्थ व्यक्ती असणं राजकारणात आवश्यक असतंच. त्यात हुकूमशाहीचा धोका मला तरी दिसत नाही.'

सकाळपासून खानसाहेबांना फोन करता करता ते १० वाजता झोपेतून उठल्याचं कळलं. त्यांच्याकडे पोचलो तो त्यांची प्रचारासाठी बाहेर निघण्याची तयारी चालू असल्याचं दिसलं. मध्यंतरी जेमतेम पाऊण तास मला मिळाला तेवढ्यातच जेवढी जमली तेवढी चर्चा मी केली. अकोल्यात शिरल्यापासून, का

कोण जाणे, पण इथल्या निवडणुकांतनं जातीय प्रचार होत असल्याचं मला उगीचच वाटत होतं. साहजिकच तो प्रश्न मी श्री. असगरना विचारला. 'तसा इथला उमेदवार जातीय विचार करणारा आहे असं मला वाटत नाही. प्लेन हीजॅकिंगचा तसा जातीय परिणाम होईलसं वाटत नाही. मात्र जनसंघ ह्या गोष्टीचं भांडवल करून, ह्या निवडणुकीला जातीय रंग द्यायचा प्रयत्न करीत आहे. अकोल्याचा मतदार त्या दृष्टीने पूर्ण जागृत आहे आणि देशाचा विचार करून इंदिराजींच्या प्रगत धोरणांच्या आड जातीय राजकारण येऊ देणार नाही ह्याची मला खात्री आहे....व्यक्तिशः माझ्याबद्दल विचाराल तर मी संपूर्णतः सेक्युलरवादी आहे. राजकारण व धर्म ह्यांची गल्लत होता कामा नये असं मला वाटतं. मुस्लिम लीग धर्म राजकारणात आणू पाहते, म्हणूनच तिला 'जातीय-पक्ष'च म्हणणं योग्य ठरेल...त्यासाठीच मुस्लिम लीगशी आमचा कसलाही संबंध नाही. केरळात किंवा उत्तर प्रदेशात कुठे कुठे मुस्लिम लीगशी आमचे समझौते झाले हे खरं. पण त्यावरून राईचा पर्वत करायचं खरं तर कारण नाही. एवढेसुद्धा संबंध असणं मला योग्य वाटत नाही. पण काही ठिकाणी स्थानिक गोष्टी ध्यानात घेणं आवश्यक ठरतं...कम्युनिस्टांबरोबरच्या काही ठिकाणच्या हातजुळवणीच्या मागेही असाच विचार आहे. कम्युनिस्टांना शासनात चंचु-प्रवेश देऊन त्यांना देशात कम्युनिझम पसरू देण्यास आम्ही मदत करीत आहोत हा जो आरोप आहे तो मला तरी मिथ्या वाटतो. केरळचा अनुभव बघितल्यास अशा जोडणीतून काँग्रेसचंच बळ वाढलंय असं दिसून येईल; कम्युनिस्टांचं नाही...'

'गरिबी हटाव ही आपली घोषणा. पण त्या दृष्टीने ठोस उपाय असे कुठेही आपल्या जाहीरनाम्यात का आढळत नाहीत?'

'आमचा १० कलमी कार्यक्रम हाच ह्यावरील एकमात्र उपाय आहे. तो अमलात आणता यावा म्हणून तर जनतेकडून कौल घ्यायला आम्ही निघालो आहोत...अर्थात एका रात्रीत गरिबी हटेल हे कधीच कुणी म्हणत नाही किंवा बेकारी आम्ही समूळ निपटून काढू असंही कुणी म्हणणार नाही. परंतु 'गरिबी हटाव'चा कार्यक्रम काँग्रेसजवळ निश्चित आहे. गेल्या वर्षातल्या एकदोन कृतींनी श्रीमती गांधींनी हे सिद्ध करून दिलं आहे निर्विवाद बहुमतांनी त्यांना आपली पावलं अधिक ठामपणे टाकता येतील म्हणूनच हा कौल. राष्ट्रीयीकरणावर टीका होते हे मान्य. पण कुठल्याही गोष्टीचं यशापयश जोखायला निदान काही काल तरी जायला हवा ना? सात महिने बँकांचं राष्ट्रीयीकरण सुप्रीम कोर्टात अडकलं होतं. त्यानंतर बँकांच्या कार्यपद्धतीत आमूलाग्र बदल घडवून आणायला तरी वेळ मिळायला हवा की नाही? राष्ट्रीयीकरणामुळे एक तरी फायदा निश्चित झाला आहे, आणि तो तुम्हीही मान्य कराल. हा फायदा म्हणजे आर्थिक सत्तेचं जे मूठभर हातात केंद्रीकरण झालं होतं ती आर्थिक सत्ता आता विकेंद्रित होत आहे. शासना-

# अकोला मतदारसंघ : काही आकडे

□ अकोला जिल्ह्यातल्या सहा तालुक्यातनं हा लोकसभा मतदारसंघ विखुरलेला असून त्यात अकोला, अकोट, बोरगाव मंजू, बाळापूर, मूर्तिजापूर, मंगरूळपीर ह्या सहा विधानसभा मतदारसंघांचा समावेश होतो. १९६७ च्या सार्वत्रिक निवडणुकीत हा लोकसभा मतदारसंघ व सहाही विधानसभेच्या जागा अविभक्त काँग्रेसने जिकल्या होत्या. श्री. आबासाहेब खेडकरांच्या मृत्यूनंतर १९७० च्या पोटनिवडणुकीत काँग्रेसचा पराभव करून श्री. तिडके ह्या अपक्षानं अकोटची जागा जिंकली. श्री. तिडके ह्यांना कम्युनिस्टेतर सर्व विरोधकांचा पाठिंबा होता.

□ एकूण मतदार संख्या ५,४०,८७३ असून ती ७२९ मतदारसंघांमध्ये विखुरलेली आहे. १९६७ च्या निवडणुकीत हीच मतदारांची संख्या ५,१३,३७८ होती. यंदाच्या मतदारांपैकी सुमारे सव्वादोन लाख मतदार शहरी असून बाकीचा खेड्यापाड्यांतनं विखुरलेला आहे.

□ निवडणुकीच्या रिंगणात पाच जण असले तरी मुख्य लढत नवकाँग्रेस व जनसंघ ह्यांतच आहे. नवकाँग्रेसचे श्री. खान मोहंमद असगर हुसेन विसर्जित लोकसभेत खासदार होते. ते पुन्हा निवडणूक लढवीत आहेत. जनसंघाचे श्री. मोतीरामजी लहाने हे जनसंघाचे महाराष्ट्राचे प्रदेशाध्यक्ष आहेत. शे. का. प.चे श्री. कराळे आहेत व एक अपक्ष श्री. सोहोनी हे जनसंघाचे भूतपूर्व अध्यक्ष. प्राऊटिस्टच्या एक स्त्री उमेदवारही रिंगणात आहे. पाचांपैकी तिघे वकिली पेशातले आहेत.

□ गेल्या चारी निवडणुकातनं, इथून काँग्रेसचेच खासदार निवडून गेले होते. १९५२ साली श्री. आबासाहेब खेडकर, १९५७ व १९६२ मध्ये श्री. एम्. एम्. हक् व १९६७ मध्ये आजचे उमेदवार श्री. असगर हुसेन निवडन गेले होते.

□ १९६२ व १९६७ मध्ये अकोला मतदारसंघातून झालेलं मतदान पुढीलप्रमाणं होतं.

| | | |
|---|---|---|
| १९६२ | श्री. एम्. एम्. हक् (काँग्रेस) | १,३५,२२६ |
| | श्री. ब्रिजलाल बियाणी (अपक्ष) | ८८,०५७ |
| | श्री. शंकरराव खंडारे (रिप.) | ६२,२३५ |
| १९६७ | श्री असगर हुसेन (काँ.) | १,८८,२४८ |
| | श्री. खंडारे (रि प. जनसंघ आदींच्या पाठिंब्यावर) | १,४१,९४५ |
| | श्री. वानखेडे (अपक्ष) | १०,०२८ |
| | श्री. शिरसाट (अपक्ष) | ३,१८१ |

धिन होऊन हा पैसा आता अधिकाधिक लोकांना उपलब्ध होणार आहे.'

'नाग-विदर्भ आंदोलनाचा ह्या निवडणुकांवर कितपत परिणाम होईल असं वाटतं आपल्याला ?'

'काही परिणाम होईल असं मला तरी वाटत नाही. विदर्भावर काही अन्याय झाले आहेत ही भावना जनतेत काही प्रमाणात आहे हे कबूल, पण त्या आंदोलनाचा जोर वाटतो तेवढा नाही हेही निश्चित. विदर्भासाठी स्वतंत्र समिती नेमल्यावर तर हा जोर आता नाहीसाच झालाय. नागपूर नि त्याच्या परिसरात विदर्भवाद्यांचा थोडा जोर आहे. पण त्याला फारसा अर्थ नाही. प्रत्यक्ष ह्या मतदार संघाबद्दल बोलायचं तर, अकोला कृषी विद्यापीठ चळवळीच्या बाजूत अकोला जिल्हा काँग्रेस कमिटीच आघाडीवर होती, नि तिनं वैदर्भीयांचा, विशेषतः अकोला जिल्ह्यातल्या जनतेचा, पुरेपूर विश्वास संपादला आहे. तेव्हा विदर्भाचं आवाहन इथे काही प्रभाव पाडील असं निदान मला तरी वाटत नाही.'

अर्थातच, निवडून आल्यानंतर विदर्भातल्या जनतेची गाऱ्हाणी मला, गतखेपेप्रमाणेच ह्या वेळीही मांडावी लागणार आहेतच नि ते मी स्वतः करणार आहेच... इथल्या रेल्वे स्टेशन्सचाही प्रश्न असाच मला खासकरून मांडावा लागणार आहे...'

श्री. खान मोहमद असगर हुसेन ह्यांच्या घरनं निघालो तेव्हा तिथेही काँग्रेसच्या विजयाचं गणित मांडलं जात होतं. भूतपूर्व जनसंघीय, माजी अध्यक्ष व रा. स्व. संघाच्या वऱ्हाड शाखेचे प्रमुख, श्री. श्री. अ. ऊर्फ बापूसाहेब सोहोनी हे जनसंघाची काही मतं तरी फोडतील असा तर्क मांडला जात होता. हे गृहस्थ जनसंघातर्फे निवडणुकीसाठी उभे राहू इच्छित होते. परंतु त्यांना तिकीट नाकारलं गेलं व त्यांनी अपक्ष म्हणून उमेदवारी घोषित केली. ते स्वतः जरी जनसंघाची फारशी मतं फोडू शकले नाहीत, तरी ते प्रसिद्ध करीत असलेली पत्रकं मात्र कदाचित जनसंघाला उपद्रव देऊ शकतील. श्री. बापूसाहेब सोहोनींना १९६७ मध्येही तिकीट नाकारण्यात आलं होतं, हे इथं लक्षात घेतलं पाहिजे. त्या वेळी रिपब्लिकन गटाच्या श्री. शंकरराव खंडाऱ्यांना पाठिंबा देऊन, जनसंघानं श्री. सोहोनी ह्यांना उमेदवारी मागे घ्यायला लावली होती. श्री. बापूसाहेबांची पत्रकं जनसंघाला भयानक शिव्या घालणारी व पर्यायाने काँग्रेसला उपयुक्त ठरतील अशी असतात. मी श्री. मोतीरामजी लहाने ह्यांना ह्यासंबंधी प्रश्न विचारला असता, त्यांनी सांगितलं की, 'तो एकंदरीत दुर्दैवी प्रकार आहे. ते उभे असले तरी, काही फार फरक पडणार आहे असं नाही. पाचशे ते हजार मतं ते खातील एवढंच.' अनेक संघकार्यकर्त्यांशी, व अपक्षांशी चर्चा केल्यावर वस्तुस्थितीही श्री. मोतीरामजींनी सांगितल्यापेक्षा काही वेगळी असल्याचं जाणवलं नाही. मात्र, बापूसाहेबांनी काढलेल्या पत्रकांच्या प्रती काढून त्या वाटण्याचा उद्योग काँग्रेसवाल्यांनी अगदी पद्धतशीरपणे चालवला आहे.

श्री. मोतीरामजींकडे गेलो तेव्हा तेही गडबडीत दिसले. श्री. नानाजीं देशमुख अकोल्यात आले होते नि त्यांच्याबरोबर श्री. मोतीरामजींचा दौरा होता. अकोल्यात कॉंग्रेस जनसंघावर वाटेल ते वृथा आरोप लादून जातीय भावना चेतवीत असल्याचा आरोप त्यांनी केला. सहकारी क्षेत्रातल्या त्यांच्या कार्याचा, समाजसेवेचा आढावा जिल्हा जनसंघप्रमुख श्री. समुद्र ह्यांनी घेतल्यावर, श्री. मोतीरामजी म्हणाले, ' जिथला बच्चा बच्चा मला ओळखतो, तिथे आणखी कसला माझा परिचय हवा ?'

बड्या आघाडीतल्या पक्षांच्या युतिसंबंधात बोलताना, ही युती नसून, केवळ निवडणूक समझौता आहे असं त्यांनी सांगितल. विशाल आघाडी निवडून आल्यास देशाला स्थिर सरकार देऊ शकेल का ह्यावर त्यांनी निश्चतपणे ' हो ' अस उत्तर दिलं. त्याचं कारण देताना ते म्हणाले, ' कॉंग्रेस हीही एक आघाडीच आहे.' शिवाय कम्युनिस्टांची त्यात भर आहे. तरीदेखील जर सत्तारूढ कॉंग्रस स्थिर सरकार देऊ शकते तर मग विशाल आघाडी का नाही देऊ शकणार ? आमच्याजवळ निदान राष्ट्रवाद, लोकशाही, एवढे तरीं दोन घटक, सर्वच घटकपक्षांजवळ समान आहेत. जनमताच्या दडपणाखाली त्यांचं स्थिर सरकार तर बनेलच पण ते अधिक कार्यक्षमही राहील...'

' संस्थानिकांच्या तनख्याबद्दल आमच्या भूमिका आम्ही वेळोवेळी प्रसिद्ध केल्या आहेत. तनखे राहावेत असं आम्हीं कधीही म्हटलेलं नाही. तनखे कालबाह्य आहेत नि ते जातीलच ह्याबद्दलही आम्हाला तिळमात्र शंका नाही. फक्त आमचा विरोध आहे तो ज्या पद्धतीने हे निर्णय घेतले गेले त्या पद्धतीला. संस्थानिकांना कस्पटासमान लेखून, त्यांचे तनखे व खास हक्क रद्द करण्याचा एकतर्फी निर्णय घेणं केव्हाही लोकशाहीत बसत नव्हतं नि त्यालाच आमचा विरोध होता. स्वतःची प्रतिमा उजळण्यासाठीं काहीतरी स्टंट करणं श्रीमति इंदिरा गांधींना आवश्यक होतं. उद्योगपतींना त्या हात लावू शकत नव्हत्या. इतर कुठेही त्यांना पाऊल उचलणं जड होतं. म्हणून त्यांनी संस्थानिकांकडे मोर्चा वळवला एवढंच. सालिना चार कोटी रुपये म्हणजे, वस्तुतः केंद्र सरकारचे इतर खर्च पाहू गेल्यास ' किस झाडकी पत्ती ' होते. शिवाय त्यांना हात लावण्याने फारसा प्रतिकार होण्याची, उपद्रव होण्याचीही शक्यता नव्हती. केवळ एवढ्याचसाठी त्यांनी हा डाव टाकला. ह्याची दुसरी बाजू जी मी तुम्हाला सांगितली तीही आम्ही आता जनतेपुढे मांडतो आहोत. आम्हाला प्रतिसाद चांगला आहे. राजे-महाराजेही आता पुढे येऊन हाच विचार मांडत आहेत. एक ट्रस्ट तयार करून तिथे सारे तनखे जमा करावेत व त्यांचा विनियोग काही जनता-कल्याणासाठीं व्हावा अशाही योजना आता आखल्या गेल्या आहेत...

' ...इथे संघर्ष आहे तो दोन आघाड्यांचा असंच आम्हीं मानतो. त्यापैकी

पृष्ठ ४५ वर

# चरणसिंग
# राष्ट्रपती
# की
# उपपंतप्रधान ?

लेखक : एक तरूण राज्यशास्त्र-विद्यार्थी

भारतावर राज्य कोण करते ?

इंदिराजी ! भांडवलदार ! उच्चवर्णीय ! अशी अनेक उत्तरे मिळतील. यात थोडेफार सत्य असले तरी खरे उत्तर असे आहे–

उत्तर प्रदेश, बिहार, राजस्थान, मध्यप्रदेश यांची बडी आघाडी. एकूण खासदार १८९ पण यात उत्तर प्रदेशचे स्थान मानाचे. भारताला तीन पंतप्रधान याच प्रांताने पुरविले.

कारण या प्रांताची अफाट लोकसंख्या म्हणून ८५ खासदार हा प्रांत पाठवितो. या खासदारांना समभाषी व समविचारी अशा बिहार, म. प्र., राजस्थानमधील खासदारांशी ' समझोता ' ' वाटणी ' करून बडी आघाडी करणे शक्य होते.

त्यात गुजरात, महाराष्ट्र, आंध्र, म्हैसूर येथील सुभेदार मिळवा. म्हणजे १८९ अधिक १२० खासदार.

या ' बड्या आघाडी 'त साम्याचे मुद्दे फार आहेत. मानसिक, सामाजिक व आर्थिक मागासलेपणा, परंपरा व रूढींचे प्राबल्य, उच्चनीचतेवर आधारित जातीचे वर्चस्व, अंधश्रद्धाळू, भोळीभाबडी जनता इत्यादि. जातीपातीच्या उच्चनीच कल्पने- मुळे परप्रांतीय वा परधर्मीय जवळच्याला लाथा देण्याच्यावेळी आपलासा वाटतो.

म्हणून मुस्लीम लीग फाळणीपूर्वी पाकिस्तानचा नारा घेऊन उत्तर प्रदेशात जोरदारपणे काम करू शकली. १९६२ नंतर मजलिसे मुशावरतच्या नावाने मुस्लीम

राजकारण सुरू झाले. आज तर मुस्लीम लीगने स्वतंत्रपणे आपले उमेदवार काँग्रेस विरुद्ध उभे करण्याचे धैर्य दाखविले आहे. आजवर काँग्रेसला बिनबोभाट मतदान करणारे मुसलमान सबसे गायीवर प्रेमाने हात फिरवतील अशी खात्री नाही. म्हणून काही मुस्लीम जागा लीगसाठी बाईंना सोडाव्या लागल्या. उत्तर प्रदेशात अनेक मुस्लीम बालेकिल्ले आहेत व इतरत्र त्यांचे मतदान निकालावर परिणाम करण्याइतके प्रभावी ठरू शकते.

या मुस्लीम विळख्याला कारण तेथ ब्राह्मण व कायस्थ, ठाकूर व जाट, यादव यांच्या चालू असलेल्या मारामाऱ्या. महाराष्ट्राप्रमाण मराठे वा आंध्राप्रमाणे रेड्डी अशी Absolute Majority या उच्चवर्णीयांची नाही. मग 'हातमिळवणी' 'समझोता' 'अर्थपूर्ण संवाद' वा 'बडी आघाडी' हे राजकारण करून सत्ताकंडू भागवायचा व इतरावर राज्य करावयाचे हे उत्तर प्रदेशचे जातीयवादी राजकारण. याबद्दल चांगली माहिती रजनी कोठारींच्या Caste in Indian Politics किंवा बॉक्टर अंडरसेनच्या Student Movement in Allahabad यात मिळेल.

मोगल इस्लामच्या नावाने अत्याचारी राज्य करीत असताना उत्तर प्रदेशी कायस्थ त्यांची इमानेइतबारे चाकरी करीत होते. इतके नव्हे तर अजूनही त्यांना उर्दू जवळची वाटते. त्यांच्यावर मुस्लीम संस्कृतिचा ठसा गडद वाटतो.

सर्वात मोठी जमात ठाकूर. मराठ्यांप्रमाणे क्षत्रिय असलेल्या ठाकुरांना मोठ्या प्रमाणात स्वातंत्र्य लढ्यात भाग घेतला. कारण मराठी ब्राह्मणाप्रमाणे हे केवळ खोत होते छोटे जमिनदार व पोलिस पाटील म्हणून यांना गावात मान असे. १९६५ पर्यंत जिल्हापातळीवरच्या राजकारणावर यांचे नियंत्रण व वर्चस्व असे. पण पुढे ठाकूर विविध पक्षात-विशेषत: जनसंघाकडे गेल्यामुळे राजकारणाची सूत्रे त्यांच्या हातातून निसटली.

लोकसंख्येने दुसरा क्रमांक जाटांचा. मराठ्यांप्रमाणे हेही शेतकरी व वारकरी. हाजरो एकर शेती असली तरी शिपाईगिरी प्रिय. यांचे नेते भरतपुरचे राजे प्रो-ब्रिटिश असल्यामुळे आपल्या सत्यशोधकांप्रमाणे हे पण स्वातंत्र्यलढ्याकडे संशयाने पाहत. १९६५ पर्यंत जाटांचा प्रभाव खेडेगावाबाहेर पडू शकला नाही. यशवंतरावा-प्रमाणे चरणसिंगानी जाटांची शक्ती ओळखली व आपल्या नेतृत्वाखाली त्यांना एकत्र राखले म्हणून आज जाट उत्तर प्रदेशचे राजे बनले आहेत.

उत्तर प्रदेशातील ब्राह्मण नुसते पोथ्या वाचणारे बडवे. मराठी ब्राह्मणप्रमाणे शूर व बुद्धिवादी नसल्याने उत्तर प्रदेशातील सांस्कृतिक जीवनावर, यांचा बौद्धिक ठसा नाही.

महाराष्ट्रात कालपरवापर्यंत ब्राह्मणाचे घर आदर्श म्हणून पाहिले जात असे. उत्तर प्रदेशात अजूनमुद्धा मुस्लीम रीतीरिवाज, काव्यकल्पना, आदर्श मानल्या

जातात. श्रीमंताना जात नसते. पण येथे श्रीमंतसुद्धा एकतर लखनवी नबावी वा आंग्ळाळलेले.

उरले हरिजन. हिंदी भाषिक आंबेडकर नसल्यामुळे बिचारे संघटित होऊ शकले नाहीत. यांचे पुढारी म्हणविणाऱ्यांचा डोळा खुर्ची वा भत्त्यावर. त्यामुळे पुन्हा हे शोचनीय स्थितीत कायम. जेव्हा एकादा जाट जमीनदार हरिजनाने मिशांचे आकडे वर वळविले म्हणून वा हरिजन घोड्यावर बसला म्हणून हरिजनांना झोडतो किंवा एकाद्या हरिजन स्त्रीवर बलात्कार होतो, व जेव्हा या अत्याचारांचे प्रतिध्वनी वृत्तपत्रात उठतात. तेव्हाच आम्ही जागे होते. अस्पृश्यताविरोधी, जातीयतेविरोधी भाषणे ठोकून भटा-पोथ्यांना जबाबदार धरून पुन्हा झोपी जातो.

उत्तर प्रदेशातील प्रत्येक जात स्वतंत्र व स्वायत्त आहे. एकीचा दुसरीशी संबंध नाही व जो आहे तो उच्चनीचतेवर आधारित. देशभक्त नेतृत्वामुळे जातीतील लोक काही प्रमाणात स्वातंत्र्यलढ्यात ओढले गेले. पण समतेची जाणीव नव्हती. बंधुभाव तर राहिला दूर.

आजही उत्तर प्रदेशात हिंदूना हिंदुत्वाच्या नावाने एकत्र आणण्याचा प्रयत्न करणारा राष्ट्रीय स्वयंसेवक संघ एकत्र जेवणामुळे, एकत्र राहण्यामुळे व समानतेमुळे सर्व जातीतील सनातन्यांना बाटगा व महाभयानक क्रांतिकारक वाटतो.

मग तेथे बुद्धिवाद, कठोर विचार मीमांसा, ही फुले–आगरकर-आंबेडकर सावरकरी परंपरा कोठे रुजणार ?

बुद्धिवादाने तेथील तरुण हिंदू धर्मद्वेशी बनून संयुक्त समाजवादी बनतात. अधिक जहाल व बेकार तरूण असेल तर नक्षलवादी बनतो. तर राष्ट्रभक्त तरूण जनसंघात वाजपेयींच्या प्रेमाने जातो.

पण चिडलेल्या, निराश, हरिजन तरुणांबाबत एक धोक्याची सूचना देतो. त्यांना न्याय द्या, तरच देशाचे भले. नाहीतर–

अल्पसंख्याकांची आघाडी करण्याचा प्रयत्न जातीय मुसलमान करीत आहेत. त्यात उर्दूला राज्यभाषेचा दर्जा हवा या मागणीबरोबरच विधानसभा व नोकऱ्यात जमातवार प्रतिनिधित्व हवे हे विषबीज आहे. अपमान व निराशा यामुळे हरिजन या आघाडीत जाण्याचा धोका आहे. अलाहाबाद विद्यापीठ विद्यार्थी संघाच्या निवडणुकीत अशी आघाडी झाली होती.

विद्यार्थी परिषद सावधान !

राष्ट्रवाद्यांनो सावधान !

उत्तर प्रदेशात बंडखोरीची 'तुतारी' कोणी फुंकली नाही. सामाजिक क्रांति विचारांची आग कोणी भडकविली नाही. ५० वर्षापूर्वी उत्तर प्रदेश 'एक थंड गोळा होता.' त्याला थोडीफार उब देण्याचे काम महामना पंडित मदन मोहन मालवीय यांनी केले.

आदर्श चारित्र्य, ऋषितुल्य व्यक्तिमत्त्व, मिठ्ठी जबान, संघटना चातुर्य, प्रचंड निधी उभे करण्याचे कसब, शिक्षणाची तळमळ अशा अनेक गुणांबाबत पंडित मालवीयांच्या तोडीचा नेता भारतात मिळणे कठीण. जर अच्युतराव पटवर्धनां- सारखा समाजवादी वा भूपेश गुप्तांसारखा कम्युनिस्ट, हिंदू संघटक मालवीयांच्या आठवणीने सद्‌गदित होतो तर विद्यार्थी परिषदेने पं. मालवीय पुस्तक पेढी काढली तर नवल काय ?

तरी पण असे महामना राजकीय विचारात मवाळ व श्रद्धेने सनातनी होते.

अस्पृश्योद्धार, स्त्रीशिक्षण, बनारस हिंदू विद्यापीठ, हिंदू संघटन यामुळे पंडित- जींचा ठसा अजूनपर्यंत कायम आहे. – महात्माजी तर पंडितजींना ' बडे भाई 'चा मान देत व मालवीयसुद्धा गांधीजींचे श्रेष्ठत्व ओळखून होते, म्हणून पं. पुरुषोत्तम- दास टंडन, पं. पंत, लालबहादूर शास्त्री, डॉ. संपूर्णानंद असे मालवीयांचे स्वातंत्र्य- वादी हिंदुत्वनिष्ठ शिष्य काँग्रेसमध्ये राहिले.

पण या सर्वांना आपल्या तेजोमय व्यक्तिमत्वाने जवाहरलाल नेहरूंनी झाकून टाकले. श्रीमंत मोतीलालजींचा इंग्लंड रिटर्न राजबिंडा पुत्र बॅरिस्टरकी सोडून स्वातंत्र्यलढ्यात उतरतो, गरीब शेतकऱ्यांचे लढे लढवितो, तुरुंगात जातो, उन्हा- पावसातून हिंडतो, यामुळे खेड्यातील भोळी गरीब जनता भारून जाऊन जवाहरलालजींना राजा मानत होती तर समाजवादी विचार, लालित्यपूर्ण लेखणी यावर तरुणवर्ग खूष होते.






गांधीजींच्या आशीर्वादाबरोबर जवाहरलाल उत्तर प्रदेशचे – हा मुद्दा पंतप्रधान निवडताना लक्षात ठेवला गेला असावा.

बेचाळीसच्या लढ्याची पार्श्वभूमी असे नेते व कार्यकर्ते यावर काँग्रेस १९४५ च्या निवडणूकीत प्रचंड मताने निवडून आली.

स्वातंत्र्यानंतर सत्तावादी राजकारण देशात सुरू झाले. इतर ठिकाणांप्रमाणे उत्तरप्रदेशातही जातीवाद राजकारणात पसरला. पं. पंत असेपर्यंत तो काबूत होता. पण पंतांच्या मृत्यूनंतर डॉ संपूर्णानंदांना हुसकावून त्रिपाठी–गुप्ता झुंज सुरु झाली. या दोघांनी सत्ता व

संघटना ताब्यात ठेवण्यासाठी कोणतेही मार्ग वर्ज मानले नाहीत. यांच्या गटबाजी-पुढे नेहरूंनी हात टेकले, तेथे इतरांची काय कथा?

या गटबाजीने जातीयवाद फोफावला. जातीप्रमाणे आमदार व मंत्रीपदे ठरत गेली. एक नवे जाट नेतृत्व या आधारावर १९५१ साली उदयास येत होते. त्याचे नाव चौधरी चरणसिंग.

१९०२ साली जन्मलेले चरणसिंग M. A. L. L. B. झाल्यावर १९२८ ते ३० पर्यंत वकिली करीत होते. १९२९ साली कॉंग्रेसमध्ये सामील झाल्यावर मीरत डिस्ट्रिक्ट बोर्डाचे उपाध्यक्ष होते. १९३२ ला आमदार म्हणून चरणसिंग विधान-सभेत शिरले. स्वातंत्र्य लढ्यात भाग घेतल्यानंतर १९४८ ते १९५६ पर्यंत कॉंग्रेस विधीमंडळ गटाचे सरचिटणीस या नात्याने त्यांनी आमदार जमवले – जोडले यशवंतरावांप्रमाणे, चरणसिगांनी १९४८ ते १९५१ पर्यंत पंत मंत्रिमंडळात पार्ले-मेंटरी सेक्रेटरी म्हणून उमेदवारी केली व एकदा १९५१ सालच्या जूनमध्ये न्याय व माहितीमंत्री झाल्यावर पुढे त्यांनी मंत्रीपद सोडले नाही.

१९५१ साली नागपूर कॉंग्रेसमध्ये संयुक्त शेतीच्या प्रश्नावर नेहरूंना विरोध करण्याचे धैर्य दाखविल्यामुळे चरणसिंग प्रकाशात आले. पण चरणसिंग नुसते बड्या जमीनदारांचे दलाल नव्हते. जे Agrarian Relation Bill केरळने गेल्या-वर्षी संमत केले, त्याची अमलबजावणी चरणसिगांनी उत्तर प्रदेशात केव्हाच सुरु केली. उत्तर प्रदेशातील शेतकी सुधारणा चळवळीमागची प्रेरणाशक्ती तेच होते 'जमीनदारी का नको?' 'सहकारी शेतीवर क्ष-किरण' व भारताचे दारिद्र्य व त्यावर उपाय' अशी पुस्तके त्यांनी लिहिली.

म्हणून शेतकरी जाटांबरोबर यादव, मुसलमान असे ग्रामीण गट चरणसिंगा-जवळ गेले.

गुप्ता–त्रिपाठी मारामारीत मुख्यमंत्री बदलत होते. पण कृषिमंत्री, महसूलमंत्री गृहमंत्री अशा विविध व महत्त्वाच्या जागेवर काम करून एक चारित्र्यवान व अनु-भवी मंत्री म्हणून चौधरी चरणसिंगांनी नाव कमाविले. ठाकूर–कायस्थ–ब्राह्मण भगड्यात जाटांना त्यांनी आपल्या नेतृत्वाखाली एकत्र आणले.

१९६७ ची देशातील अस्थिर परिस्थिती पाहून, गुप्ताजींच्या मुख्यमंत्रीपदाला धक्का देऊन चरणसिंग कॉंग्रेसबाहेर पडले ते विरोधी पक्षीयांच्या विधायक दलाचे नेते व मुख्यमंत्री होण्यासाठी.

या अनुभवानंतर बिहार व मध्य प्रदेशमधील असंतुष्ट कॉंग्रेसवाल्यांनी बंड करून बिगर कॉंग्रेसी मंत्रिमंडळाबरोबर आयाराम–गयारामीला सुरवात केली. बिहार-मधील महामायाप्रसाद, चरणसिंग, म. प्र.मधील गोविंद नारायण सिंग अशा असंतुष्ट कॉंग्रेसजनांनी भारतीय क्रांतीदल नावाचा पक्ष काढला. पुढे आयाराम–गयाराम मध्ये महामायाप्रसाद गडगडले, गोविंद नारायण कॉंग्रेस वैकुंठाला गेले. टिकले फक्त

चरणसिंग पण तेही फेब्रुवारी १९६८मध्ये मुख्यमंत्रीपदावरून फेकले गेले.

१९६८ मधील मध्यावधी निवडणुकीत उत्तर प्रदेश विधान सभेत ९८ जागा पटकावून चरणसिंगांनी सर्वांना आश्चर्याचा धक्का दिला. इतरत्र न टिकणारा क्रांतिदल पक्ष फक्त टिकला येथे. त्यालाही कारण चरणसिंगाचे एकखांबी नेतृत्व व जाट मान्यता. हा विजय चरणसिंगांनी जनसंघाला पराभवाचा आणि आश्चर्याचा धक्का देऊन मिळविला. १९६७ साली ९९ जागा मिळवून भावी राज्यकर्तेपदाची स्वप्ने पाहणाऱ्या जनसंघाला फक्त ४८ जागांवर गप्प बसावे लागले.

या पराभवाबद्दल १९६८ मधील जनसंघ मुंबई अधिवेशनात कार्यकर्त्यांनी कुशल संघटक नानाजी देशमुख यांना काय धारेवर धरले होते ? शेवटी वाजपेयींना मध्ये पडून नानाजींची बाजू उचलून धरावी लागली. नानाजींची चिटणीसपदावरून कोषाध्यक्षपदी नेमणूक होण्याचे हे तर कारण नसेल ? १९६८ साली जनसंघ–क्रांतिदल युती का होऊ शकली नाही ? का शिवसेनेप्रमाणे, क्रांतिदलाला जनसंघ स्थानिक पक्ष समजत होता ?

विरोधी पक्षात गप्प बसणे हे चरणसिंगांच्या स्वभावात नव्हते. १९६९ च्या कॉंग्रेस फाटाफुटीत सनातनी कर्मठ त्रिपाठी इंडिकेटकडे गेले व समाजवादी–बहुजन-समाजी गुप्ता सिंडिकेटकडे राहिले. इंडिकेटी त्रिपाठी गटाने गुप्ता मंत्रिमंडळाचा पाठिंबा काढून घेतल्यावर चंद्रभानजी व कॉंग्रेसविरोधी संसप, जनसंघ चरणसिंगाचे चरण चेपू लागले. उपमुख्यमंत्रीपदाचा सन्मान त्यांना देऊ केला. पण विधायक दलाचा अनुभव लक्षात घेऊन संसोपाच्या सासुरवासापेक्षा इंदिराजी बऱ्या असा निर्णय घेऊन चरणसिंग पुन्हा मुख्यमंत्री झाले. हा पण संबंध फार काळ टिकला नाही. कारण मुख्यमंत्री चरणसिंग असले तरी जास्त आमदार त्रिपाठींचे होते. त्रिपाठींचे दडपण मानवेना व चरणसिंगांची दादागिरी सोसवेना असा प्रकार झाला दोन्ही पक्ष पैसे गोळा करण्यात, ताकद वाढविण्यात मग्न. घटस्फोटास फक्त कारण हवे होते.

प्रिव्ही पर्सला क्रांतिदलाने विरोध केल्याचे कारण पुरले. चरणसिंगांवर नव-कॉंग्रेस रुसल्यावर सिंडिकेट, जनसंघ, संसोपाचे पुन्हा प्रेम बसले. पुन्हा विधायक दल. पण यावेळी चरणसिंग व गुप्ता असे दोन उमेदवार. शेवटी सर्वमान्य म्हणून शास्त्रीशिष्य टी. एन्. सिंग निवडले गेले. त्यांच्या दुर्दैवाने मणिरामला टी. एन्. सिंग पडले. लगेच नैतिकतेच्या नावाने राजीनामा मागून चरणसिंगांनी दडपण आणण्याचा प्रयत्न केला. सार्वत्रिक निवडणूक गळ्याशी आल्याने शेवटी ते गप्प बसले ही गोष्ट वेगळी पण नैतिकतेचा शिरपेच चढला तो वेगळा.

उत्तर प्रदेश विधायक दलात असलेले चरणसिंग ' बड्या आघाडी 'त का सामील होत नाहीत ? चरणसिंग व त्यांचे क्रांतिदलाचे तत्त्वज्ञान काय ?

भारतीय क्रांतिदलाचे तत्त्वज्ञान चरणसिंग व चरणसिंगांचे तत्त्वज्ञान सत्ता (पुन्हा

यशवंतराव). ज्या मार्गाने सत्ता मिळेल तो मार्ग चरणसिंगाचा. मग जाटाचे राजे, शेतकऱ्याचे हितकर्ते, ग्रामीण भारतीय संस्कृतीचे प्रतीक, समाजवादी कोणतेही लेबल लावा.

मनापासून जमिनीवर सिलिंग मान्य नाही, स्त्रीयांच्या नोकऱ्या, त्यांचे समाजकारण, पुढाकार पसंत नाही. जमीनदारी पद्धतीवर नसला, तरी जमीनदारी वृत्तीवर विश्वास म्हणून एक नवा विचार त्यांनी मांडला—अध्यक्षीय लोकशाहीचा.


पुन्हा सत्तास्वार्थच.

जाटांचे राजे म्हणून पश्चिम उत्तर प्रदेश, उत्तर राजस्थान, हरियाना हातात. हिंदी भाषिक म्हणून बिहार, मध्यप्रदेश मागे. राष्ट्रवादाने जनसंघ व 'हट व'ने संसोपा, सिंडिकेट पाठिंबा शक्य.

कपडे साधे असले तरी विचार साधे नाहीत. चरणसिंगाचे डोळे धूर्त व कठोर मुत्सद्याचे दर्शन घडवितात.

मग चरणसिंग कोणत्या आघाडीत का नाही गेले? त्यांचा अंदाज असा: स्वतंत्रपणे ५० वर जागा मिळाल्या व जर इंडिकेट आघाडी व बडी आघाडी यांना २००-२०० जागा मिळाल्या, तर उद्याच्या संसदेत निर्णायक शक्ती चरणसिंगाकडे राहील. त्यांचा भाव वाढेल. अखिल भारतीय पक्ष मनधरणी करतील. पंतप्रधानपद नसले तरी उपपंतप्रधानपद नक्की. (मग पंतप्रधानपद दूर किती? आणखी एक कट)

त्यावेळी निधर्मी, राष्ट्रवादी, साधा शेतकरी नेता या वर्णनांनी वृत्तपत्रे, जाट जमातीचा पुढारी, सत्तास्वार्थी, जमीनदारी वृत्तीचा, स्त्रीद्वेष्टा नेता या मूळ स्वरूपावर पांघरूण घालतीलच





# 'गौतम बुद्धाचा स्पर्श'

श्रीकांत इनामदार

माझं नाव वामनराव. माझ्या रोजच्या आयुष्यात मी अनेकदा मरतो. कित्येकदा तर इतका जिव्हारी मरतो की दोन दोन दिवस मी कोणाशी बोलत नाही. अशा वेळी मग मला माझाच तिरस्कार वाटत असतो. स्वतःच्या आणि आजूबाजूच्या असंख्य लोकांच्या जीवनात क्षुद्रता किती खोलवर गेली आहे याचा मला साक्षात्कार होतो. उच्च तत्त्वांचा स्वीकार राहू देत पण त्यांची साधी ओळख करून घेण्या-इतपत लोकांची तयारी राहिलेली नाही. भाववाढ, दंगे आणि लाचलुचपत यावर बोलायला ते तयार असतात. पण एखाद्या उमद्या आणि सुस्वभावी तरुणानं एखाद्या सुंदर तरुणीच्या नादात स्वतःला गळफास लावून घेतला तर या गोष्टीवर खोलात जाऊन चर्चा करण्याची त्यांची तयारी नसते. मूर्ख आहे झालं, अशा स्वरूपाचं एखाद वाक्य टाकून ते पुनः आपल्या नेहमीच्या विषयाकडे वळतात. एखाद्या तरुणाच

आयुष्य म्हणजे काही मोलाची वस्तू असते याची कोणाला जाणीव उरलेली नाही. मी मात्र अशा वेळी उगाचच अस्वस्थ होतो. घड जेवत नाही. कोणाशी बोलावं म्हटलं तर शब्द ओठातच अडतात. सारखा विचार येतो की तो तरुण मेला हे एकंदरीत वाईटच झालं पण जिच्यासाठी तो मेला त्या तरुणीला त्याच्या मनात असलेला तिच्याविषयीच्या प्रेमाचा प्रचंड हेलावता सागर कधी तरी कळेल का? आणि कित्येकदा वाटतं की तिला ते न कळणं तिच्या पुढच्या आयुष्याच्या दृष्टीनं फार चांगलं आहे. भावनाचं कोतेपण अनेक दृष्टीनं चांगलं असतं. उपकारक असतं. संरक्षक असतं या जगात ज्यांना जास्त कळतं, जात्या दिवसांबरोबर ज्यांच्या जाणीवा विस्तारत जातात, हृदय मृदू होतं आणि भावनांना सर्वस्पर्शी अशी तरलता येते त्यांना फार दुःख भोगावं लागतं. वस्तुतः जे होत असतं तो त्यांच्या आत्म्याचा अत्यंत नैसर्गिक असा विकास असतो. इतर लोकांच्या मानानं आपल्याला काही तरी अधिक गवसलं आहे याची त्यांना जाण येते, खूण पटते. लोक मात्र अशा माणसांना अधिकाधिक टोचत असतात. व्यवहारशून्य म्हणतात. प्रथम वाईट वाटतं. मग त्याचीही सवय होते. अलीकडं लोक माझ्याबद्दल असंच बोलतात. मी त्याची सवय करून घेतो आहे.

मी आणि माझ्या मित्र एकदा कॉलेजमधून उपनगरात असलेल्या आमच्या रूमकडे चाललो होतो. दोघांकडे रेल्वेचे पास होते. वाटेत अपघात झाला. एका बाईनं धावत येऊन स्वतःला रेल्वेच्या चाकात अक्षरशः फेकून दिलं होतं. गाडी थांबली आणि आम्ही खाली उतरून तिला पाहिली तेव्हा ती गाडीच्या चाकांना जवळजवळ सबध गुंडाळली गेली होती. मित्र ते दृष्य पाहून हादरला. तिथंच रडू लागला. मी तर एका क्षणात मेलो. थिजून गेलो. आयुष्यात त्या वेळेला मी प्रथम मेलो. पोलीस आले. इंजिन मागेपुढे सरकवून तिला चाकापासून सुटं केलं गेलं. तिच्या शरीराचे तुकडे गोळा करून एका स्ट्रेचरवर ठेवण्यात आले. पंचनामा झाला. अर्ध्या तासात गाडी सुरूदेखील झाली. पुढे दोन दिवस मला जेवण गेलं नाही. मी एकसारखा स्वतःला विचारीत होतो की तिनं स्वतःला गाडीच्या धडधडत्या चाकाखाली फेकून देणं ही केवळ बाह्य क्रिया झाली. पण अशा तऱ्हेनं वागायला तिला भाग पाडणारं तिच्या मनातलं दुःख किती तीव्र असेल, केवढं प्रचंड आणि बलवान असेल, केवढं क्रूर आणि तरीही एका वेगळ्याच अर्थानं किती दयाळू असेल? प्रचंड भावनाप्रक्षोभ आणि त्यानंतर माणसानं केलेली आत्महत्या ही गोष्ट मला तेव्हा कॉलेजमध्ये असताना जितकी गूढ आणि करुण वाटत असे तितकीच आज दहा वर्षांनंतर वाटते. मग लक्षात येतं की तेव्हाइतकेच आजही आपण अनभिज्ञ आहोत. मानवी व्यवहार आणि त्या मागचे हेतू यांची आपणाला काहीही माहिती नाही. आणि मग आपल्या अज्ञानाची ही खंतच दिसांमाशी वाढत राहते. मनात घर करते. मुलामाणसांनी, भावाबहिणींनी, चुलत्यापुतण्यांनी आणि गडीमाणसांनी भरलेल्या घरात

माझ्या या गूढ दुःखाची कोण ओळख करून घेणार ? कोण त्याची कदर करणार ? तेवढा वेळ आहे कोणाला ! आणि मुख्य म्हणजे प्रयत्न करूनदेखील माझं दुःख माझ्याइतक्या तीव्रतेनं त्यांना कसं जाणवणार ?

शिक्षण संपलं. ठिकठिकाणी नोकरीसाठी अर्ज केले. इंटरव्ह्यू देऊ लागलो. असाच रिटन टेस्टसाठी पुण्याला गेलो. दोन पेपर होते. शेवटचा पेपर देऊन बाहेर आलो. हिवाळ्याचे दिवस असावेत. दिवस जवळ जवळ बुडाला होता. एक मुलगी सारखी हातातल्या टिचभर घड्याळाकडे पाहत हॉलपुढच्या व्हरांड्यात उभी होती. आत परीक्षा चालली होती. पण परीक्षेसाठी ती आली नसावी. माझ्या मित्राने पेपर अजून टाकला नव्हता. मी व्हरांड्यातच रेंगाळलो. सगळीकडे गूढ गंभीर संधिप्रकाश पडला होता. मुलगी सुंदर होती. चांगल्या घरची वाटत होती. तिला शोभेल असा एक रुबाबदार तरुण आला आणि आनंदानं फुलून निघालेल्या मुद्रेनं ती त्याच्याबरोबर निघून गेली. तारुण्याच्या सहजसुंदर आविष्काराची इतकी सहजसुंदर परिणती मी कधीच पाहिली नव्हती. माझं जुजबी शिक्षण, कोती बौद्धिक पात्रता, आरोग्यहीन शरीर आणि केविलवाणी आर्थिक स्थिती मला अशा सुंदर तरुणीचा कधीही लाभ घडवून देणार नाहीत याची एका क्षणात मला जाणीव झाली आणि मी मेलो. आयुष्याच्या प्रचंड कोलाहलात माझं अती क्षुद्र स्थान मला अचानक ठेच लागावी तसं झणकन् समजलं. त्यानंतर अनेक दिवस त्या दृष्यानं मनाला झालेली जखम भरून आणण्यात घालवले. मनाला आलेली उदासीनता आणि कटुता प्रयत्नपूर्वक घालवली. आज कोणाचा प्रेमविवाह झाल्याचं समजलं की तोंडावर मोराचं पिस फिरवल्यासारखा मी आनंदी होतो. कशाचीही आपल्याशी तुलना करायची नाही, जे अपरिहार्य आहे ते समजावून घ्यायचं, हट्ट करायचा नाही हे आता माझं मन शिकलं आहे. तरीही हे सर्व अखेर मनाला शिकवावं लागलं याचंच दुःख होतं. कधी संध्याकाळचा घराच्या गच्चीवर आरामखुर्ची टाकून बसलो आणि आयुष्यात आपण कितीदा मेलो याचा हिशेब करू लागलो की आठवतं, पुण्याला त्या संध्याकाळी कॉलेजच्या परिसरात मी दुसऱ्यांदा मेलो.

पुढं दोन चार वर्षे फार धांदलीत गेली. ऑफिसात वरिष्ठांशी पटेना म्हणून मी नोकरीचा राजीनामा दिला. गावी येऊन शेती बघू लागलो. शहरी सुखांना चटावलेल्या माझ्या पत्नीला खेडेगावची राहणी मानवेना. एकत्र कुटुंबात रहणं, जमवून घेणं जुळेना. आमची फार भांडणे झाली. मुलगा झाला. मुलगी झाली. दोन अपत्यांचा बाप झालो. पत्नी संसारात रमली. माझ्या मनाची हळवी अवस्था कमी होईल असं वाटलं. तसं व्हावं म्हणून रोज घरखर्चाचे, शेतीचे हिशेब लिहायचो. कज्जेकोर्ट आणि असल्याच फालतू गोष्टींत लक्ष घालायचो. त्यांच्याबद्दल चर्चा करायचो. पण मध्येच वडील गेले. एकादशीला देवाच्या पायावर डोकं ठेवल्या ठेवल्या आपले प्राण जाणार असं ते सगळ्यांना छातीठोकपणे सांगत. एकदा नव्हे, दोनदा,

नव्हे संबंध वर्षभर येणाऱ्या जाणाऱ्या प्रत्येकाला ही गोष्ट ऐकवत. हृदयविकारचे दोन झटके मेंदूत गेले होते. ते जाणार हे ठरलेलंच होतं. आयुष्यभर उपासतापास केलेले, जपजाप्य आणि हरीनाम यात प्रत्येक मोकळा क्षण वेचलेले माझे वडील शेवटी संडासात मरून पडले. चार तास झाले तरी बाहेर का येईनात म्हणून दार फोडून त्यांना त्या तशा अवस्थेत बाहेर काढावं लागलं. त्यांच्या मागणीप्रमाणे त्यांना मरण यायला पाहिजे होतं, असं मी म्हणत नाही. देवाच्या दारचा न्याय वेगळा असतो हे मलाही मान्य आहे. मुलाबाळात मरण येऊ द्यायला तर काही हरकत नव्हती ? पण नाही. आमच्यातून ओढून नेऊन, ज्याची इच्छा एकादशीला देवाच्या पायावर डोकं ठेवून मरायची होती त्याला शेवटी संडासासारख्या गलिच्छ जागी मरायला लावून दैवानं त्यांची क्रूर विटंबना केली. वडील गेले यापेक्षा ते असे गेले याचं दुःख फार झालं. कधी रडलो नाही, त्या दिवशी त्यांना नेताना कितीही आवरले तरी अश्रू टपटपू लागले. मग मन आवरलंच नाही. मुक्तपणे रडलो. लहान मुलासारखा रडलो. जात्या वर्षांनी दिलेलं सर्व खोटं मोठेपण, कर्तेपण, विसरून रडलो, धाकटे भाऊच आपलं दुःख विसरून मला समजावू लागले. माझ्या आयुष्यात मी तिसऱ्यांदा मेलो होतो.

या प्रसंगानंतर मी पूर्वी कधी नव्हे इतका हळवा झालो. खाण्यासाठी हट्ट घेतलेल्या मुलांच्यावर बायको ओरडलेली ऐकलं तरी विलक्षण संतापत असे. अनेक गोष्टीत घरच्यांचं आणि माझं पटेना. आमच्या घरची एक जमीन विकली आणि त्या जमिनीत अनेक वर्षे राबणारा आमचा वाटेकरी उघडा पडला. चार कच्चीबच्ची घरात ठेवून बायकोबरोबर माझ्या डोळ्यादेखत दुसऱ्यांच्या शेतावर मजुरी करायला जाऊ लागला. यावेळी मी सावध होतो. मन घट्ट केलं. मेलो नाही. मरून चालणार नव्हतं. बहिणीच्या लग्नासाठी जमीन विकली होती. आमच्याजवळ रोख पैसा येण्याचा तेवढा एकच मार्ग होता. उरावर धोंडा ठेवला.

माझी बहीण सुंदर होती. रसरशीत होती. शिक्षण मॅट्रिकपर्यंत झालेलं असलं तरी वाचनाची आवड प्रचंड होती. शिवण, भरतकाम या गोष्टीत प्रवीण होती. एखाद्या कसलेल्या गायिकेनं गाण्यात घेतलेल्या अवघड जागेसारखं तिचं व्यक्तिमत्त्व अनमोल होतं. ती नुसती खोलीत माझ्या आसपास वावरू लागली तरी माझ्या हृदयाला अनाकलनीय अशा कळा लागत. तिचं मितभाषी अस्तित्व उदबत्तीच्या धुरासारखं आजूबाजूच्या वातावरणात सहज मिसळे. मनाला फार वेगळा असा आनंद देई. तिचं मन मी जाणलं होतं. शहरातल्या एखाद्या गरीब पण सुशिक्षित अशा तरुणाशी तिचं लग्न करून द्यायचं मी ठरवलं होतं. पण मध्येच तिला सहज म्हणून माझ्या मधल्या भावानं खेडेगावातल्या एका धनाढ्य घरातल्या मुलाला दाखवली. त्याला ती पसंत पडली. त्याच्या घरात पिढीजात सावकारी होती. दीड-दोनशे एकर जमीन होती. मुलगा एकुलता एक होता. शहरात मॅट्रिकनंतर चार

वर्षे महाविद्यालयीन शिक्षणाच्या नावाखाली फुकट घालवून आला होता. (हे मला लग्नानंतर माहेरी आलेल्या बहिणीनं 'सहज' म्हणून सांगितलं आणि ती उठून गेली.) मी नको नको म्हणत असताना मला वेड्यात काढून घरातल्यांनी बहिणीला त्या घरात दिली. चारसहा महिन्यांनी तो आणि ती दिवाळीसणाला घरी आली. बहीण दागिन्यांनी लहडली होती, उंची पातळांनी सजली होती. पण तिचे डोळे रिकामे दिसत होते. अंगावर नुसती हाडं उरली होती. ती येणार म्हणून मी तालु-क्याच्या गावी जाऊन पाच सहा दिवाळी अंक विकत आणले. पण तिनं ते उघडून-देखील पाहिले नाहीत. तिच्या 'ह्यांना' तिनं पुस्तकात आणि मासिकात डोकं घालून बसलेलं आवडत नसे. लग्नापूर्वी अंगापिडानं चांगल्या भरलेल्या माझ्या बहिणीच्या शरीराची स्थिती पाहिल्याबरोबर दोन मुलं असलेल्या माझ्यासारख्या संसारी माणसाला, शहरात जाऊन वासना चाळवून परत आलेल्या तिच्या नवऱ्याला नेमकं काय आवडतं ते लगेच लक्षात आलं. मी पुन्हा एकदा मेलो. आपल्या हातांनी मी बहिणीला नरकात ढकललं असं मला वाटू लागलं. आपण त्या वेळी आक्रस्ताळे-पणा का केला नाही, लग्न का मोडलं नाही याची खंत वाटू लागली. गळ्यात सोन्याचा मारुती गुंफलेला काळा दोरा घातलेल्या, केस बारीक कापलेल्या, निर्बुद्ध चेहऱ्याच्या माझ्या मेहुण्याचं तो केवळ श्रीमंत आहे म्हणून पत्नी आणि घरातले सर्व कौतुक करीत होते आणि माडीवर एकटाच बसलेला मी पुनःपुन: कपाळाला बाम चोळत होतो. आयुष्यात मी चौथ्यांदा मेलो होतो.

आता पुन: मरण्याची इच्छा नाही. पस्तिशीतच मी संपलो आहे. अलीकडे माझी प्रकृती नीट राहत नाही. बारीक ताप येतो. अन्नावर वासना जात नाही. कशात मन रमत नाही. पत्नीच्या देहाचं तर दर्शनदेखील नको वाटतं. दिवसेंदिवस मी अधिकाधिक चिडका होत चाललो आहे. दारावर भिकारी आला की घरात ढीगभर शिळं अन्न असून पत्नी त्याला परत पाठवते. मग मी भयानक संतापतो. इतक्या छोट्या कारणासाठी मी एवढं चिडावं याचं तिला आश्चर्य वाटतं. मी संतापतो तो तिच्या कोत्या आणि क्षुद्र मनोवृत्तीवर पण वडील गेल्यानंतर मी नेमका कशासाठी ढसढसून रडलो ते जसं तिला कधी कळणार नाही. तसंच हेही ध्यानात येणार नाही. तिला समजेल अशी भाषा माझ्याजवळ नाही. तिलाच असं नव्हे पण कोणालाच आता काही समजावून सांगावं असं वाटत नाही. आपण एखादी गोष्ट घडण्यापासून रोखू शकू हा विश्वास उरलेला नाही. मन इतकं हलकं झालं आहे की अगदी साध्या प्रसंगानं घायाळ होतं. कोणाचं एखादंच वाक्य उगाचंच मनाला लागतं. घरचे, दारचे कोणीच मनापासनं बोलत नाहीत. सगळे दूर असतात. फटकून वागतात. मलाच दोष देतात. विचित्र नजरेनं माझ्याकडे पाहतात. मी आसपास नाही याची खात्री करून घेऊन कुजबुजत्या स्वरात माझ्याविषयी बोलतात. माझ्या विचित्र वागण्यानं भ्यालेली बायको अकारण जादा प्रेमानं वागते. खोटी ममता दाखवते.

मला सर्व कळतं. पण मी बोलत नाही. बोलून उपयोग नसतो. दरीच्या एका बाजूला मी उभा आहे आणि दुसऱ्या बाजूला ते सर्वजण ! आमच्यातला हा अंतराय आता कधीच भरून निघणार नाही.

हे सर्व माझ्या लक्षात येतं तेव्हा मला फार वाईट वाटतं. मुलाबाळांनी भरलेल्या घरात मी मात्र एकटा पडलो आहे ही जाणीव बोचत रहाते. पण मानवी जीवनातल्या अत्यंत तरल आणि सूक्ष्म अशा कळहांना, त्यामधील अंतर्गत विरोधांना आणि असहाय्य व विटंबित अशा जिण्याला माझं माझं म्हणून कवटाळण्याच्या मानवी हव्यासाला मी मनातून इतका भयानक घाबरलो आहे की कोणाशी आपणहून गप्पा मारायला जावंसं वाटत नाही. लोकात मिसळायचं म्हणजे माझ्या अंगावर काटा येतो. त्यापेक्षा आहे हा एकांत परवडला असं वाटतं.

कधी कधी संध्याकाळी एकटाच बसलो की वाटतं आपल्याला काहीच कळलं नाही हा आपला समज खोटा आहे. कदाचित आपल्याला खूप कळलं असावं आणि त्याचा परिणाम म्हणून आजची आपली ही मानसिक अवस्था असावी. पण मग लगेच रेल्वेच्या चाकांना गुंडाळली गेलेली ती स्त्री, संडासात मरून पडलेले माझे वडील, प्रियकराच्या हातात हात घालून आनंदानं जाणारी ती तरुणी आणि निःसत्व झालेली रिकाम्या डोळ्यांची माझी अबोल बहीण माझ्या नजरेसमोर येते आणि माझा तोल जातो. मी संतापू लागतो, घरातल्या लोकांवर गुरासारखा ओरडू लागतो, हातात असेल ती वस्तू कोणालाही फेकून मारू लागतो...

...आता नुसतं लाक्षणिक अर्थानं पुनःपुन्हा जिव्हारी मरायची माझी तयारी नाही. मला ते खरं, शांती देणारं स्वर्गीय मरण हवं आहे. दुःख आणि सुख यांबद्दल समभाव धारण करायला लावणारं परम पवित्र असं निर्वाण हवं आहे.



माणूस प्रतिनिधी सु. ल. सोमण यांजकडून

---

# पीक तर सोळा आणे आहे !

---

नाशकात प्रवेश करताना परिस्थिती मोठी विचित्र झाली होती माझी. ह्या आधी कुलाब्यात प्रवेश करता करताच माझ्या हाती काही माहिती जमा झाली होती. मुंब्र्याहून पनवेलकडे जाण्यासाठी क्यूमध्ये उभा असतानाच काही काही निवडणुकांविषयीचे संवाद कानी पडले होते. इथे परिस्थिती वेगळी होती. मुंबईहून नासिकला येताना गाडीतदेखील वास्तविक काही नासिककर होते. परंतु तिथे निवडणुकांविषयी पारच औदासिन्य आढळले. नासिक रोडहून नाशकाला घेऊन येणाऱ्या टॅक्सी ड्रायव्हरलाही मी विश्वासात घेऊन बोलतं करायचा प्रयत्न केला. पण छे ! नाव नको. इतर गप्पा त्यानं मला चिकार सुनावल्या. पण निवडणुकांवर गाडी येताच स्वारीनं झिडकारल्यागत म्हटलं, 'काही दम नाही बघा ह्या निवडणुकात. आणि खरं विचाराल तर, सगळेच चोर आहेत. तिथे कुणाला मत द्यायचं ?' मोठ्या आशेनं रस्त्यावर बघत होतो; पण तिथेही निराशाच पदरी आली. कुठेही निवडणूक कचेऱ्या दिसत नव्हत्या की कर्णे लावून फिरणाऱ्या जिप्स दिसत नव्हत्या. मात्र अभावानंच, दोन उमेदवारांचे प्रचार फलक दिसत होते. नासिक मतदारसंघातूनही नंतर हिंडताना ह्याच अनुभव आला. भिंती रंगल्या आहेत. प्रचारफलक झळकत आहेत, इंदिराबाई–यशवंतराव–बच्छराजजी व्यास वगैरे बड्या नेत्यांच्या सभा होऊन गेल्या आहेत. गावकरी-देशदूत आपापल्या परीनं जास्तीत जास्त खुलवून निवडणूक आघाड्या साकारीत आहेत – पण एवढं सारं असूनही नासिकवासीयांच्या अंगात निवडणूक आली आहे असं मात्र कुठेही आढळलं नाही. प्रचारानं शीग गाठल्याचं जाणवलं नाही !! निवडणुका तोंडावर आल्या असूनही तरुणांचे टोळके इंग्लिगवर्थ-चॅपेलचे पवित्रे चर्चित आहेत. वयस्कांचे सांजघोळके शिळोप्याच्या गप्पा मारताना दिसताहेत. क्वचित कुठे निवडणुकांचं बोलणं चालू

# उमेदवारांना यशाची पूर्ण खात्री

असलेलं आढळतं पण तेही धारिया-म्हाळगी लढतीवरचं; आगासकर-करिआप्पा झोंबाझोबीचं, टाटा-फर्नांडिस फडाचं ! अभावानंच कुठे कवडे-पवार झुंज डोकावून गेली. जवळ जवळ सरळ लढत असतानाही कवडे-पवार झुंजीकडे तिथल्याच प्रेक्षकांचं लक्ष नसल्याचं मला जाणवलं

वास्तविक ही लढत कदाचित फार चुरशीची व्हायची शक्यता आहे. एकतर लढत सरळ सरळ आहे. नवकाँग्रेस, बडी आघाडी व तीन अपक्ष ह्यांच्यातली खरी ही लढत. पण तिन्ही अपक्षांना कुणाचा पाठिंबा नाही. त्यांचे कुठेही प्रचारफलक नाहीत की काही हस्तपत्रकंही नाहीत. तिन्ही अपक्षांचा प्रचार जवळजवळ शून्य आहे. अर्थात त्यामुळे मतांमध्ये फार मोठी फाटाफूट होऊन त्याचा फायदा नवकाँग्रेसला मिळणार आहे अशी काही परिस्थिती नाही. त्यातच नवकाँग्रेसमधली नासिक जिल्ह्यातली गटबाजी सर्वश्रुत आहे. नासिक जिल्हा परिषद व नासिक डिस्ट्रिक्ट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक ही दोन त्या गटबाजीची अत्यंत बोलकी, चालू उदाहरणं आहेत. ह्या गटबाजीमुळे दोन्ही संस्थांच्या नाड्या आज 'भाक्रांद'च्या हातात असलेल्या दिसून येतात. त्यातही गंमत म्हणजे, जि. प. मध्ये व्यंकटराव. हिरे गटाच्या पाठिंब्यावर भाक्रांद सत्तास्थानी आहे, तर बँकेत पंडित धर्मा गटानं भाक्रांदच्या धैर्यशीलराव पवारांना चेअरमनपदावर बसवलं आहे. ना. व्यंकटराव हिऱ्यांनी नवकाँग्रेसच्याच विरोधी गटाच्या चौघांवर अब्रुनुकसानीची फिर्याद गुदरलेली आहे. आज दोन्ही गट श्री. अण्णासाहेब कवड्यांसाठी बरबर काम करताना दिसत असले, तशी ग्वाही अण्णासाहेब स्वतः व जिल्ह्यातले अन्य काँग्रेस पुढारी देत असले तरी, दोन गटांतली तेढ ज्या थराला पोचली आहे ते पाहता ऐन वेळी दगाफटका होणारच नाही असं कुणीही छातीठोकपणे सांगू शकणार नाही.

किंबहुना, व्यंकटराव हिऱ्यांचा गट, आजही अंतस्थपणे श्री. धैर्यशीलराव पवारांचं काम करीत आहे असंही एका पत्रकारानं मला सांगितलं. इथला उजवा कम्युनिस्ट गट साधारणपणे ना. हिऱ्यांना साथ देतो. तोही आज काहीसा स्वस्थ दिसतो ते सुद्धा ह्याच कारणानं असावं कदाचित. गावकरीचे संपादक श्री. दादासाहेब पोतनीस हे इथल्या कॉंग्रेसचेच. कॉंग्रेस-प्रचार सभातनं ते बोलतात. त्यांनी सांगितलेलं मत म्हणूनच मला विचारात घ्यावंसं वाटलं. ते म्हणाले, '...एरवी कॉंग्रेस उमेदवाराचं यश इथे धोक्यात नाही. कॉंग्रेस इथे पडलीच तर ती कॉंग्रेसमुळेच पडेल हेही तितकंच खरं...' विरोधकही श्री. धैर्यशील पवारांच्या विजयाचं गणित मांडताना कॉंग्रेसमधल्या अंतर्गत फाटाफुटीचा फायदा गृहीत धरूनच बोलतात.

सुरगणाचे महाराज श्री. धैर्यशीलराव पवारांनी स्वतः निवडणुकीविषयी कुठलाही अंदाज व्यक्त करण्यास नकार दिला. परंतु त्यांच्या पुरस्कर्त्यांनी मात्र महाराजांच्या विजयाचं गणित ठामपणं मांडलं आणि हे गणित मांडताना नव-कॉंग्रेसअंतर्गत भांडणांवर जसा भर त्यांनी दिला तितकाच भर त्यांनी महाराजांच्या वैयक्तिक लोकप्रियतेवरही दिला. एकंदर नासिक जिल्हा—राजकारणाची ओळख करून देताना, 'देशदूत'चे संपादक श्री. टॅंबे, जनसंघाचे कार्यकर्ते श्री. बंडोपंत जोशी आदींनी सांगितलं की, '...इथलं राजकारण 'पक्षाचं' आहे असं म्हणण्यापेक्षा गटबाजीचं अधिक आहे आणि ही गटबाजी बव्हंशी कॉंग्रेसअंतर्गत भांडणातनंच इथल्या राजकारणात रुळली आहे. मग श्री. हिऱ्यांच्या गटात सर्वपक्षीय जशी सापडतील तशीच ती धर्मा पंडितांच्या गटातही आढळतील. हे गट कसे काम करतात त्यावर निवडणुकीचं चित्र बरंचसं अवलंबून राहील...' अशा बऱ्याच छोट्या छोट्या गटांनी महाराजांना पाठिंबा दर्शवला आहे. शिवाय काही मोठे गटही आहेतच. जनसंघाचं शहर भागात कार्य चांगलं आहे. त्यांच्याजवळ यंत्रणाही सुविहीत आहे तर 'भाक्रांद'मधले सगळेच कॉंग्रेसच्याच पठडीतले असल्याने खेड्यापाड्यांतल्या प्रचारतंत्रात ते नव-कॉंग्रेसच्या मागे राहणार नाहीत. जिल्ह्यातले हे दोन प्रमुख विरोधी पक्ष, नव-कॉंग्रेसअंतर्गत भांडणांमुळे खा. आण्णासाहेब कवडे ह्यांच्याविषयी उदास असलेले गट, जि. परिषद, 'भाक्रांद'च्या ताब्यातल्या जिल्ह्यातल्या आठ पंचायत समित्या आणि महाराज धैर्यशीलराव ह्यांच्याखातर व्यक्तिशः 'राबणारे' असंख्य अपक्षीय कार्यकर्ते ह्या भांडवलावर नवकॉंग्रेसच्या श्री. अण्णासाहेब कवड्यांचा निश्चित पराभव करून 'भाक्रांद'चे 'बडी आघाडी' उमेदवार महाराज धैर्यशीलराव पवार लोकसभेत जातील ह्याविषयी त्यांच्या पुरस्कर्त्यांत कमालीचा आत्मविश्वास जाणवला. हा आत्मविश्वास मला वेळोवेळी बोलून दाखवला गेला. '...पीक तर सोळा आणे आहे. सोमणसाहेब, ते वेचलं कसं जातं ह्यावर सगळं अवलंबून आहे. कार्यकर्ते ज्या पद्धतीने हिंडताहेत आणि पीक वेचून आणीत आहेत त्यावरून यशाचा काटा आमच्या दिशेनं निश्चित सरकला आहे...इंदिरा गांधींच्या आणि

नवकाँग्रेसच्या भूलथापांना बळी पडून मतं त्यांच्या पेटीत पडतील असं जर काहींना वाटत असेल तर तो भ्रम आहे. मतदार, अशा भूलथापांना बळी पडण्याइतपत दूध-खुळा राहिला आहे असं कुणी समजू नये...'

काँग्रेसी निवडणूक कचेऱ्यातनंही काँग्रेसच्या विजयाची शंभर टक्के खात्री आढळून आली. विशेष म्हणजे जे फाटाफुटीचे गणित विरोधक मांडतात ती फाटाफूट काँग्रेसवाले उघडउघड मान्य करतात. परंतु त्याचबरोबर ते हेदेखील आग्रहानं सांगतात की, फाटाफूटीवर आधारीत जे गणित विरोधकांनी मांडलं आहे, त्यातच ते धोका खाणार आहेत. जिल्हा काँग्रेस अध्यक्ष श्री. वाघरे ह्यांनी सांगितलं की, '...ह्या निवडणुकीपुरता तरी गटबाजीवर पडदा पडला आहे ह्याबद्दल मी खात्री देऊ शकेन. श्री. व्यंकटराव हिरे व श्री. पंडित धर्मा पाटील दोघंही एका व्यासपीठावर येऊन एकत्रित होऊन हिरीरीन अण्णासाहेबांचा प्रचार करीत आलेत आणि हे मोठे गट एकत्रित आल्यावर त्याच्यापुढे बाकी सारी शक्ती फिकी आहे हे विरोधकही जाणून आहेत. त्यातच दादासाहेब गायकवाड व त्यांच्या रिपब्लिकन पक्षाचा आम्हाला संपूर्ण पाठिंबा आहे आणि ह्या जिल्ह्यात तोच खरा रिपब्लिकन पक्ष आहे...ह्याशिवाय 'भाक्रांद'चे कित्येक कार्यकर्ते, नेते व इतरही विरोधक रोजच्या रोज आम्हाला मिळत आहेत; आमची बाजू अधिक बळकट करीत आहेत. ह्या पार्श्वभूमिवर आमचा विजय निश्चित आहे ह्याची मला तरी शंका वाटत नाही.' अनेक काँग्रेसकार्यांनीही हेच विचार वेगवेगळ्या शब्दात मांडले. एकानं काँग्रेसला ३०–३५ हजारांची आघाडी मिळेल असं सांगून, ह्यामध्ये फार मोठा वाटा मुसलमान मतांचा, स्त्रिवर्गाचा नि रिपब्लिकन मतांचा असेल असंही सांगितलं तर एका काँग्रेसी पत्रकारान खालच्या आवाजात सांगितलं–' काँग्रेसच यश निश्चित आहे नि तेही गटबाजीला ह्या निवडणुकं पुरतं तरी वेसण घातलं गेलं आहे ह्यामुळेच ! ह्याचं श्रेय मात्र यशवंतरावकडे आणि वसंतरावदादांकडेच जाईल. दोघांनीही दम देऊन ठेवला आहे–ज्या विधानसभा मतदार संघातनं काँग्रेसला मतं कमी मिळतील तिथल्या सध्याच्या आमदारांना ७२ मध्ये तिकीटं नाहीत हे निश्चित ! ह्या दमदाटीच्यामुळे निर्माण झालेल्या भितीपोटीच हे दोन्ही गट काँग्रेसविरोधी काम करायला तर धजणार नाहीतच पण त्याचबरोबर स्वतःच्या क्षेत्रातून श्री. भा रा. कवडे यांना मते जास्तीत जास्त कशी मिळतील ह्याचाच ते प्रयत्न करतील'

कर्मवीर खा. दादासाहेब गायकवाड गेल्या दोन वर्षांपासून आजारीच आहेत. त्यांना भेटलो. बोलतानाही त्यांना त्रास होत होता. परंतु तशाही अवस्थेत त्यांच्या दौऱ्याच्या कार्यक्रमांचा आग्रह घेऊन येणारे त्यांचे चाहते येतच होते आणि तसा त्यांचा दौराही दि. २२ पासून आखला गेला आहे. माझ्या प्रश्नांना त्रोटक उत्तरं महत्प्रयासानं देताना त्यांनीही काँग्रेस विजयाची खात्री दर्शविली आणि तीस-पस्तीस हजार रिपब्लिकन मतं खात्रीन श्री. अण्णासाहेब कवड्यांनाच मिळतील असं

मला सांगितलं... आमच्या काँग्रेस पाठिंब्याची प्रमुख कारणे दोन: त्यांनी आमच्या पक्षाला खराखुरा रिपब्लिकन पक्ष असल्याचं कबूल केलं हे एक. दुसरं म्हणजे राजकारणातली पडत असलेली त्यांची समाजवादी पावलं...दादासाहेबांनी मला पुढे सांगितलं. ह्या रिपब्लिकन मतांबरोबर मुसलमान, ख्रिश्चन मतही एक गठ्ठा काँग्रेसला मिळतील असाही विश्वास बोलून दाखवला गेला. कम्युनिस्टांची ८-१० हजार मतंही ते खात्रीनं काँग्रेसचीच असल्याचं सांगतात. काँग्रेसच्या विजयाच्या गणितातल्या ह्या मुद्द्यांबरोबर अर्थातच इंदिराजी व यशवंतरावजी ह्यांच्या नेतृत्त्वावरील जनतेच्या विश्वासाचा मुद्दाही प्रामुख्यानं मांडला जातो. त्याचबरोबर संसोपा कार्यकर्त्यांतल्या असंतोषाचाही फायदा काँग्रेसला मिळेल असंही काँग्रेसी गोटात बोलून दाखवलं गेलं. जिल्ह्यातल्या दोन्ही लोकसभा मतदार संघासाठी 'भाक्रांद'चेच उमेदवार गेल्याने संसप कार्यकर्त्यांत नाराजी आहे. ही मंडळी अद्याप तरी 'आघाडी' उमेदवाराचा प्रचार करायला लागलेली मला दिसली नाहीत. अशाही वदंता आहेत की ऐनवेळी स्वतःला 'ससप'वादी म्हणविणाऱ्या सोमनाथ मणियारना किंवा मालेगावच्या श्री. या. ना. यादवांना पाठिंबा जाहिर करून 'संसोपा' कार्यकर्ते त्याचा प्रचार करू लागतील. असं घडलं तर, कदाचित चार पाच हजार मतं, की जी एरवी काँग्रेस-विरोधाखातर, महाराजांना मिळाली असती, ती ह्या एखाद्या अपक्षाच्या पेटीत जाऊन त्याचा अपरिहार्य फायदा नव-काँग्रेसला मिळेल.

अशा निवडणूक पार्श्वभूमीवर मी दोन्ही उमेदवारांना भेटलो. मोठ्या कटोकटीनं प्रयत्न केला तेव्हा भेटी मिळाल्या. कारण अर्थातच उघड होतं. ठिकठिकाणी मोठ-मोठ्या सभा घेऊन, मोठमोठ्या पुढाऱ्यांच्या सभा भरवून आणवून किंवा प्रत्येक मतदारापर्यंत पोचून प्रचार करण्याइतपत वेळ कुणालाच नव्हता. साहजिकच ठिकठिकाणच्या छोट्या छोट्या बैठकवजा सभांवरच भर होता. एकेका दिवसात १०–१२ गावांना भेटीचा कार्यक्रम आखलेला आढळे. ह्या कार्यक्रमाच्या सत्रातून उमेदवारांना गाठून त्यांचे विचार समजून घेणं खरोखरच कठीण काम होतं. पण नशिबानं दोन्ही प्रमुख उमेदवार मला भेटले. भाक्रांदचे बड्या आघाडीचे उमेदवार श्री. धैर्यशीलराव पवार नाशकात पोचलो त्याच दिवशी भेटले, तर नवकाँग्रेसचे उमेदवार श्री. आण्णासाहेब कवडे हे दुसरे दिवशी भेटले. दोघांही उमेदवारांमध्ये कमालीचं साम्य आढळलं ते अशामुळे, की दोघंही प्रतिस्पर्धी, कमालीचे शांत व अत्यंत सरळ वाटले. खरं तर दोघांचाही पिंड मूलतः राजकीय वाटला नाही. दोन्ही उमेदवारांना, परस्परांविषयी आदरभाव असल्यासारखं वाटलं. धैर्यशीलराव पवारांविषयी बोलताना श्री. आण्णासाहेब म्हणाले, महाराज आहेत अत्यंत उमद्या स्वभावाचे, खिलाडू वृत्तीचे, राजे लोकांमधली 'अहं'पणाची भावना धैर्यशीलराव पवारांजवळ नावालाही आढळत नाही. खुद्द त्यांच्याविषयी आदराचीच भावना

तुम्हाला नाशिकभर सर्वत्र आढळेल.. तर श्री. आण्णासाहेबांविषयीही काहीशी अशीच भावना महाराजांनी व्यक्त केली. सहज-सरळ प्रवृत्तीच्या ह्या व्यक्तीच्या ह्या लढ्या निमित्तानं चाललेल्या प्रचारात मात्र महाराज म्हणूनच श्री. धैर्यशीलराव पवारांविरुद्ध टीकेची राळ उडवली जात आहे. आणि 'झोपा काढणारे,' 'निष्क्रिय,' 'चव्हाणांचे होयबा' इत्यादि शेलक्या शिव्यांनी विरोधक श्री. कवडर्यांविरुद्ध प्रचारांच्या तोफा डागत आहेत...

धैर्यशीलराव पवारांना मी विचारलेल्या प्रयत्नांची सुरुवात, साहजिकच महाराजांच्या तनख्यांसंबंधीची होती. काँग्रेसी प्रचार त्यांच्या 'राजे'पणाचं भांडवल करून घेत होता. 'तनखे जाणार हे आम्ही ओळखून आहोत.' माझ्या प्रश्नाचा रोख ध्यानात घेऊन श्री. धैर्यशीलराव म्हणाले, 'आजि तनखे व खास हक्क कालविसंगत असून ते जावेत या मताचा मी आहे. खास हक्कांचा नि सवलतींचा तर मी व्यक्तिशः तरी कधी फायदा घेतला नाही. कोणीही नाशिककर हे तुम्हाला सांगू शकेल. तनख्यातली पै न् पै माझ्या नोकरांवर व अन्य सामाजिक गोष्टींवर खर्च होते हे माझे हिशेब तुम्हाला पटवून देतील. अशा परिस्थितीत मी तनख्याच्यासाठी हटून बसलो आहे असा प्रचार म्हणजे शुद्ध थोतांड आहे. आमचं म्हणणं एवढंच आहे की, तनखे व खास हक्क रद्द आवश्य केले जावेत पण त्यासाठी काही निकषांवर आधारित चर्चा होऊन त्याद्वारे हा प्रश्न सोडवला जावा. केवळ लेखणीच्या एखाद्या फटक्यासरशी, एखाद्या व्यक्तीच्या लहरीखातर एकतर्फी निर्णय घेतला जाऊन जर का तनखे रद्द केले जाणार असतील तर मात्र त्याला साहजिकच आमचा विरोध राहील. पण तनखे असेच चालू राहावेत, हे मात्र मलाच नाही, तर बव्हंशी सर्वच संस्थानिकांना मान्य नाही, हे निश्चित. त्यातून वाचणाऱ्या पैशांचा उपयोग जनतेसाठी होत असेल तर याही घटकेला तनखे सोडायला आम्ही तयार आहोत. परंतु तसलीही कुठली खास योजना शासनाजवळ नाही...अर्थात, पुढे काही घडेपर्यंत तनख्यांच्या पैशांचा एक सार्वजनिक निधी उभा करून त्याद्वारे सामाजिक आवश्यकतेची काम करायची योजना माजी नरेशांनी आखली आहे. हे सारं काही वेळोवेळी सांगितलं गेलं आहे. स्पष्ट केलं गेलं आहे. पण तरीही ह्या मुद्द्याचं राजकीय भांडवल करून अपप्रचार केला जात आहे. जनता अर्थातच समंजस आहे ह्याची मला जाण आहे. ती ह्या घाणेरड्या प्रचाराला बळी पडणार नाही ह्याची मला खात्री आहे...संस्थानिकांविरुद्ध असे प्रचार करताना ह्यांना स्वतःला मात्र, माजी नरेश नवकाँग्रेस उमेदवार म्हणून चालतात! तिथे ह्या नरेशांची भलावण चालते. तुम्हाला कल्पना नसेल की, काँग्रेसने उभ्या केलेल्या ३५–४० माजी नरेशांपैकी सर्वच्या सर्व, माजी नरेशांच्या कृती समितीनं मंजूर केलेल्या ठरावाशी सहमत आहेत'...

ह्या प्रश्नानंतर राजेसाहेब नवकाँग्रेसच्या ढोंगीपणाकडे वळले. समाजवादाच्या

नावाखाली नवकाँग्रेसने देशाची दिवाळखोरी चालविली आहे असं सांगून श्री. पवार पुढे म्हणाले, ' ह्यातनं कम्युनिझमचा अनुनय चालू आहे. उद्या सरकारात कम्युनिझमला इंदिराबाईंनी चंचुप्रवेश जरी दिला तरी, भारतातली लोकशाही धोक्यात येऊ शकेल. ह्याचसाठी ही बडी आघाडी. ' भाक्रांद 'च्या महाराष्ट्र शाखेनं परस्पर विरोधी मतं धारण करणाऱ्या आघाडीतल्या पक्षांशी युती केल्याच्या संदर्भात, श्री. धैर्यशीलरावांनी ही युती असल्याचंच अमान्य केलं. ' हा केवळ निवडणूक समझोता आहे; युती नाही. म्हणूनच प्रत्येक पक्षानं स्वतःचा स्वतंत्र जाहीरनामा प्रसिद्ध केला आहे. काँग्रेसविरोध एकत्रित करून, इंदिरा गांधींच्या ढोंगी राजकारणापासून देशाला वाचवावं एवढाच मर्यादित उद्देश ह्या समझोत्यामागे आहे. '

प्रश्न : पण मग ही आघाडी जर सत्तेवर आली तर...?

उत्तर : सत्तेवर आलीच तर, आघाडी देशाला स्थिर सरकार देऊ शकेल त्याची मला खात्री आहे. जनतेचं दडपण केवढं असतं ह्याची तुम्हाला कल्पना येऊ शकणार नाही. पण हे दडपणच, आघाडीच्या नेत्यांना सर्वमान्य राष्ट्रीय कार्यक्रम तयार करायला लावून तो राबवायला भाग पाडील. आघाडी सरकार यशस्वी होईल ह्याबद्दल माझ्या मनात तरी संदेह नाही.

भाक्रांद च्या उत्तर प्रदेशातल्या कोलांटया उडयांवर बोलताना श्री. पवार म्हणाले ' ते तसं पाहूं गेल्यास व्यक्तिगत राजकारण झालं होतं. खरं सांगायचं तर देशात सध्या सर्वत्रच व्यक्तिगत राजकारण चालू आहे. पक्षनिती, पक्षशिस्त किंवा काही मार्गदर्शक तत्त्वे ह्यावर इथलं राजकारण मुळीच चालू नाही. परिणामतः व्यक्तीच्या व्यक्तिगत महत्त्वाकांक्षेभोवती राजकारण फिरू लागतं. त्यातनंच अनिष्ट प्रवृत्ति निर्माण होतात. हे टाळलं पाहिजे. त्यासाठी लोकशाही अधिक बळकट केली पाहिजे.

जिल्ह्यासमोर अतिशय निकडीच्या अशा उभ्या असलेल्या प्रश्नांपैकी पाझर तलावाचा व विहिरी खोदण्याचा प्रश्न तातडीचा असल्याचे त्यांनी सांगितलं जि. परिषदेद्वारा हे काम भाक्रांद आपल्या परीनं हाताळीत असला तरी दिल्लीतनं सूत्र हालवली गेली पाहिजेत असंही त्यांनी सांगितले. आदिवासींचे प्रश्न, ओढर मिग वसाहतीतले रस्त्याचे प्रश्न आदिकडेही त्यांनी माझं लक्ष वेधून घेतलं.

महाराजांची अशी विचारसरणी असली तरी त्यांच्या विरुद्धचा सारा प्रचार त्यांच्या ' राजे 'पणामुळेच होता. साहजिकच हे तनखे, राजा दिनेश सिंग, सावंतवाडीचे राजे आदिंची नवकाँग्रेसतर्फेची उमेदवारी ह्याविषयी नवकाँग्रेस उमेदवारांचं म्हणणं जाणून घ्यायची मला उत्सुकता होती. त्या दृष्टीनेच मी श्री. आण्णासाहेबांना प्रश्न टाकला. सकाळच्या पदयात्रेनंतर श्री. कवडे दमून भागून घरी आले होते व लागलीच दुपारी नांदगावला सभेसाठी जायचे होते. मधल्या अर्ध्या पाऊण तासात मी त्यांना गाठलं. ' राजे महाराजांचे तनखे कालविसंगत आहेत हे तर तुम्ही

मान्य करालच, मला उत्तर देताना श्री. आण्णासाहेब कवठे सांगत होते. ते जावेत ह्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत व राहू. आता जे कोणी राजे महाराजे काँग्रे-सच्या तिकीटावर उभे आहेत त्यांना काँग्रेसचं हे धोरण मान्य आहे हे उघड आहे... सावंतवाडीच्या राजेसाहेबांनी ' कॉन्कोर्ड 'च्या त्या सभेला आपण उपस्थितच नव्हतो असं जाहिरपणे सांगितलं आहे...त्याचप्रमाणे, युवराज करणसिंगांनी तनखा व खास हक्क स्वतःपुरते रद्द करून घेण्याची घोषणा केली आहे. अगदी एकतर्फी व तीही ह्या बील लोकसभेपुढे येण्यापूर्वी. अशाच घोषणा, काँग्रेसच्या प्लॅटफॉर्मवर येऊं पहाणा-यांनी एकतर्फी कराव्यात ह्याच्याशी मी अर्थातच सहमागी आहे. तशा कुणी केलेल्या नाहीत व तरीही त्यांना तिकीट मिळाली आहेत हेही कबूल. पण ही तिकीटं त्यांनी काँग्रेसचा कार्यक्रम संपूर्णपणे स्वीकारला आहे हे सांगितल्या

---

## श्री. धैर्यशीलराव पवार

शाक्रांदतर्फे उभे असलेले बडया आघाडीचे सुरगणा महाराज हेच नव-काँग्रेसचे ह्या मतदार संघातले खरेखुरे प्रतिस्पर्धी. तेही पूर्वी काँग्रेसमध्येच होते व भाऊसाहेब हिऱ्यांचे निकटचे सहकारी होते. १९६७ मध्ये हिरे गट काँग्रेसमधून बाहेर पडला; त्याचबरोबर श्री. पवारांनीही काँग्रेसला रामराम ठोकला. आज ते त्या गटाबरोबर शाक्रांदमध्ये असून, महाराष्ट्रातील शाक्रांदचे प्रांतिक अध्यक्ष आहेत.

तालुकेवजा छोटयाशा सुरगणा संस्थानच्या ह्या सत्ताधाऱ्यानं, १९४७ मध्ये स. पटेलांच्या आवाहनाला पहिला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला व सर्वप्रथम संस्थान विलीन केलं. त्याचप्रमाणे आपली सर्व जमीन त्यांनी स्वतः सोडून कुळांना वाटून दिली. आज त्यांच्या ताब्यात, जंगल धरून, फक्त ४१ एकर जमीन आहे. त्यातल्या जंगलावर आदिवासींनी कब्जा केला आहे. मराठा विद्या प्रसारक समाजाचे चेअरमन, आदिवासी सेवा संघाचे अध्यक्ष, नासिक जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष इत्यादी जागांवर त्यांनी काम केली असून सध्या ते नासिक डिस्ट्रिक्ट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँकेच्या चेअरमनपदी आहेत. नासिक जिल्ह्याच्या सर्व आर्थिक नाडया ह्या बँकेच्या हाती आहेत असं सांगण्यात येतं.

उत्कृष्ट क्रीडापटु असलेल्या महाराजांबद्दल जनतेतच नव्हे तर विरोध-कातही आदराची भावना आहे. सच्छिल, शांत, महाराजांना ' राजे ' वा ' महाराज ' ही उपाधी आवडत नाही असं त्यांच्या निकटवर्तियांकडून मला सांगितलं गेलं.

---

पत्तरचा! ...आणि शेवटी काही काही ठिकाणी स्थानिक कारणांमुळे तडजोडही आवश्यक ठरते.

अशाच तडजोडी काँग्रेसनं काही ठिकाणी कम्युनिस्ट व मुस्लिम लीगसाठी त्या जागा सोडल्या त्यांच्या मुळाशी होत्या. पण त्याचा अर्थ आम्ही एखाद्या पक्षाशी युति केली आहे असा मात्र निश्चित नाही... मुस्लीम लीग जातीयवादी आहे हे उघड सत्य आहे. आणि तिच्याबरोबरची सत्तेतली सहभागी कुणीही सहन करणार नाही हेही तितकंच खरं. मुस्लीम लीगला काँग्रेसही जातीयवादीच मानते व काँग्रेस मुस्लीम लीग वा अन्य कुठल्याही जातीय संस्थेबरोबर केंद्रस्थानी सहकार्य करणार नाही...' द्रमुक 'ची भूमिका दिवसेंदिवस बदलत चालली आहे. तेथे राष्ट्रीय भावना प्रादेशिक भावनेक्षा प्रबल ठरू पाहात आहे. आणि म्हणूनच समाजवादी दृष्टिकोन असणाऱ्या द्रमुक बरोबर प्राप्त परिस्थितीत मद्रासमध्य सहकार्य करण्यास काहीच हरकत नव्हती...

'कम्युनिस्टांच्या चंचूप्रवेशाबद्दल विचाराल, तर ती भिती मला अजिबात वाटत नाही. त्याच एकमेव कारण म्हणजे इथल्या जनमानसात भिनलेल्या प्रवृत्ती. इथे कम्युनिझमला थारा मिळत नाही. उलटपक्षी, केरळमध्ये कम्युनिस्टांबरोबर सहकार्य करून, डाव्या–उजव्या कम्युनिस्टांपेक्षाही काँग्रेसलाच आपलं बळ वाढवता आलं हे कसं विसरता येईल....विधानसभा, जिल्हा परिषदा, नगर परिषदा पंचायत समित्या इतक्या विविध स्तरांपर्यंत पोचून, ही लोकशाही पद्धती नष्ट करून कम्युनिझम लादणं इथं शक्य होणार नाही. कम्युनिस्टांबद्दल भिती बाळगायचं कारण नाही. असं मी म्हणतो ते यासाठी...ह्याच कारणांनी, केवळ जर काही ठिकाणच्या तडजोडींनी काँग्रेसचं बळ वाढून लोकशाही स्थिर व्हायला मदत होणार असेल तर, मला वाटतं कम्युनिस्टांच्या बरोबरच्या तडजोडीचा बाऊ केला जाऊ नये ...'

'आण्णासाहेब, जिल्ह्यातून हिंडताना, बरेच ठिकाणी मला असं ऐकू आलं की, खासदार झाल्यापासून गेल्या चार वर्षांत आपण मतदारसंघात फिरकला नाहीत की मतदारसंघाच्या अपेक्षा पूर्ण केल्या नाहीत ?'

'एका अर्थी हा आक्षेप खरा आहे.' श्री. कवडे ह्या प्रश्नावर काहीसे अंतर्मुख होऊन बोलू लागले. 'ह्या संबंधात खरं तर काही स्पष्टीकरण देऊ नये. मतदार जागृत आहे. निवडून दिलेल्या आमदार-खासदाराकडून त्यांची अपेक्षा वाढलेली आहे. खासदारान वरचेवर मतदारसंघात येऊन तिथल्याशी चर्चा कराव्यात, त्यांचे प्रश्न असल्यास समजून घ्यावेत, शक्य असल्यास ते सोडवावेत ह्या त्यांच्या अपेक्षा असतात व त्या रास्त आहेत. मी तर अभिमानानं असंही म्हणेन, नासिकच्या मतदारांना ही चांगली संवय इथले पहिले खासदार श्री. गोविंदराव देशपांडे ह्यांनी लावली आहे. ते कुठेही असोत, कुठेही निघाले असोत, महिन्या-दोन महिन्यातन

मतदार संघात येऊन इथल्या जनतेशी चर्चा करून जायचे. काही सभा घेऊन, राजधानीत काय चाललंय त्याची कल्पना जनतेला देऊन जायचे. हे मी केलेल नाही ही वस्तुस्थिती आहे, नि म्हणूनच मतदारांनी तसा आरोप केला तर त्यात त्यांचं काही चुकलंच असं मला वाटत नाही. पण तुम्ही बारकाईनं बघाल तर जवळजवळ प्रत्येक खासदाराविरुद्ध असेच आरोप आढळतील आपल्याला. जॉर्ज फर्नांडिसविरुद्ध असेच आरोप मुंबईचा मतदार करताना दिसेल. वास्तविक जॉर्जचा तर प्रत्येक क्षण काही ना काही सामाजिक कार्यासाठी खर्ची पडत असतो. खुद माझ्या बाबतीत बोलायचं तर, वर्षातले आठ महिने संसदेचं अधिवेशन चालू होतं गेल्या संसदेत, चारी वर्षं परिस्थिती अशी होती की, संसद काळात दिल्ली सोडून कुठल्याही खासदाराला जवळजवळ अशक्यच होतं. ह्याशिवाय मी संसदेच्या एस्टिमेट्स् कमिटीवर होतो.'

'गेल्या चार वर्षांत वैयक्तिक कारणांसाठी, संसदासाठी घरी येऊन काही न करता पडून राहिलोय् असं कधीही झालं नाही. पण तरीही ह्या गोष्टी, मतदारांच्या अपेक्षा मी पूर्ण करू शकलो नाही ह्याच्या स्पष्टीकरणार्थ मी देऊ इच्छित नाही. माझी तर अशी धारणा झाली आहे की प्रत्येक खासदारानं इथून पुढे स्वतःच्या मतदार संघाविषयी अत्यंत जागृत राहिलं पाहिजे. नाहीतर जागृत मतदारांपुढे त्याचा निभाव लागणं अशक्य आहे. वेळच पडली तर, त्यानं कुठल्याही संसदीय कमिटयांच्याही नादी लागू नये. ह्या वेळी, म्हणूनच मी ठरवलं आहे की, मतदार संघात कटाक्षानं सातत्यानं संपर्क राखायचा ...'

ह्याखेरीज अन्य तीन उमेदवारांना गाठणं, जिल्हाभर पसरलेल्या मतदार-

---

## श्री. आण्णासाहेब ऊर्फ भा. रा. कवडे

नांदगाव तालुक्यातले श्री. भा. रा. कवडे हे विसर्जित लोकसभेतले काँग्रेसचे खासदार आहेत. व्यवसायानं ते वकील असून १९५० पासून त्यांनी सार्वजनिक कामात सक्रीय भाग घ्यायला सुरुवात केली. वृत्तीनं शांत व काहीसे अबोल अण्णासाहेब, त्यांच्या जिल्हा परिषदेतल्या कामामुळे जनतेपुढे आले. पहिल्या नासिक जिल्हा परिषदेचे ते अध्यक्ष होते व त्यांची ती अध्यक्षीय कारकीर्द चांगलीच गाजली. किंबहुना त्याच पुण्याईवर व काँग्रेसच्या नावावर १९६७ ची निवडणूक त्यांनी सहजी जिंकली.

नांदगाव तालुका खरेदी-विक्री संघाच्या सुपरवायझिंग युनियनचे चेअरमन, केंद्रशासनाच्या एस्टिमेट्स कमिटीचे सदस्य इत्यादी पदेही त्यांनी विभूषित केली आहेत.

---

संघाच्या त्यागिमुळे मला जमलं नाही. अर्थात या तिन्ही उमेदवारांचा निवडणकी वर काही परिणाम होईल हेही संभवत नाही.

दोन्ही गट ह्या घटकेला तरी आपल्या विजयाबद्दल निश्चित आहेत. प्रचार म्हणावा तसा शीगेला कुठेही पोचला नाही. 'विधानसभा निवडणूका बरोबर नसल्याने, प्रचाराला जोर आलेला नाही.' असं श्री. भा. रा. कवडे म्हणाले, श्री. पवारांच्या मते, अत्यल्प वेळ, कमी साधनं, ह्यामुळे प्रचारकार्याला गति देता येणंच शक्य झालेलं नाही. मी त्यांच्याकडे बसलो असताना ते सतत एखादी गाडी मिळवण्याच्या प्रयत्नात होते. शेवटी माझ्याकडे वळत म्हणाले, 'आज बारा वावतनं हिंडायचा प्रोग्रॅम आखला आहे. त्यासाठी ८॥ वाजता निघायचं होतं. आता ९॥ वाजले आहेत पण अद्याप मी गाडीसाठी अडकून पडलो आहे.' पुढे तर मतदार संघातनं हिंडताना मला अशीही वदंता ऐकू आली की, 'महाराज ऐनवेळी माघार घ्यायची शक्यता आहे. व त्यावेळी प्रचारार्थ हिंडण्यासाठी, मतदारांशी संपर्क साधण्यासाठी आवश्यक साधनं मिळाल्यान प्रचार होऊ शकला नाही असं कारण महाराज पुढे करतील.'. अर्थात अशा वदंतेचा महाराजांच्या गोटातनं इन्कारच केला गेला. त्यांच्या मते, आपसातल्या दुहीनं पोखरल्याने, अपयशाच्या भीतीतून हा हलकट प्रचार काँग्रेसवाल्यांनी केला आहे. कारणं काही का असेना प्रचार फार तोकडा आहे आणि निवडणुकीचं वारं खऱ्या अर्थानं तिथं खेळू लागलेलं नाही हे मात्र खरं.

आणि अशा परिस्थितीत, दोन्ही पक्षांनी आपापल्या दृष्टिकोनातून रंगवलेली चित्र मनःपटलापुढे सतत ताजी ठेवून मी मतदार संघातनं हिंडत होतो. जमेल त्याला हटकून त्याच्याशी बोलत होतो. मत अजमावयाचा प्रयत्न करीत होतो. मला आढळलेल्या चित्राची रूपरेषा अशी–

सर्वसाधारणतः शहरी विभागातनं जनसंघाला चांगला पाठिंबा आहे. विशेषतः व्यापारी वर्ग, सुशिक्षित पांढरपेशावर्ग व काही प्रमाणात हरिजन परंतु शहरी वर्गातही जनसंघाला चांगला पाठिंबा आहे, तर बहुजन समाजात महाराजांविषयी आदराची भावना आहे. जनसंघानं १९७२ च्या निवडणूकांवर डोळा ठेवून, भाऊंदच्या महाराजां या प्रचाराच्या निमित्तानं जेवढं जनतेसमोर जाता तेवढं चांगलं असा व्यावहारिक दृष्टकोन नजरेसमोर ठेवला आहे व प्रचाराला शक्य तेवढी गती दिली आहे. येवल्यात नगरपालिकेत स्वतःचं वर्चस्व असूनही गेल्या वर्षी जनसंघानं एका मुस्लिम महिलेला नगराध्यक्ष पदावर निवडून दिलं. ह्याचा एक चांगला फायदा तिथं संघाला मिळाला आहे. त्याचबरोबर भाऊंद नाशकातच केवळ संघटितरित्या उभा आहे हे विसरून चालणार नाही. नगरपालिका (नाशिक, नाशिक-रोड-देवळाली, येवला वगैरे), जिल्हा परिषद, आठ नऊ पंचायत समित्या, दि. सेंट्रल को. ऑप. बँक इत्यादींवर विरोधकांची – विशेषतः भाऊंदची पकड असल्याने त्याचा चांगला फायदा श्री. धैर्यशीलराव पवारांना मिळणार आहे. शिवाय काँग्रेस-

मधली दुफळी, विधानसभांच्या निवडणूका नसल्यानं थोडीशी दबली आहे हे खरं असलं तरी काही ठिकाणी असंतोष खदखदतोय हे नाकारता येणार नाही. त्यावर वेसण घालण्यात यशस्वी झाले तर काँग्रेस नेते यश आपल्या पक्षाकडे खेचून आणू शकतील.

शहरी भागातनं जरी काँग्रेसची वरीलप्रमाणे पिछेहाट झाली तरी, खेड्यातनं काँग्रेसची परिस्थिती भक्कम आहे यात शंका नाही. काही काही खेड्यातनं, साध-नांच्या अभावामुळे असेल कदाचित, पण विरोधी पक्षियांचे कार्यकर्ते अद्याप पोहो-चूही शकलेले नाहीत ही वस्तुस्थिती आहे. श्री. काकासाहेब वाघ, श्री. व्यंकटराव हिरे, श्री. पंडित धर्मा पाटील ह्यांचं खेड्यातलं वजन अजूनही भक्कम आहे. साखर कारखान्यांच्या राजकारणात काँग्रेसचा वरचष्मा आहे व तिथलं राजकारण, फार मोठ्या प्रमाणावर साखर–सत्ताधाऱ्यांवर अवलंबून राहील ही वस्तुस्थिती. शेत-कऱ्यांतनंही हीच परिस्थिती आहे. ह्याशिवाय इंदिरा गांधींच्या, नाशकातल्या तेरा मिनिटांच्या भाषणानं (ह्या भाषणासाठी सतरा हजार रुपयांचा चुराडा झाला असे आरोप विरोधकांनी चालू केले आहेत, ते अलाहिदा !) खुद्द नाशकातही काही फरक घडवून आणले आहेत हेही तितकंच खरं. एका धोब्यानं सांगितलं, ' इंदिरा-जींके भाषणनें यहाँ का सारा रंग बदल दिया है ! उनके पास कार्यक्रम है। उन्हीकी काँग्रेस जित जायेगी इसमे तो संदेह नही !' निफाडहून बाजारासाठी आलेला शेत-करी म्हणाला, ' पब्लिक काय इतकी वुळी नाही. इंदिराजी काय म्हनती, काय करती आनि हे बाकीचे काय म्हनतात ते काय समजत नाय ? शेवटाला समदं काम आमची काकासायबाचीच माणसं करत्यात. मला चार सालापासून कर्जी हवी होती. समद्याला सांगून जालं. पण इंदिराजींचं नवं राज आलं तवाच मला कर्जी मिळाली.' त्याच्या मनाचा कल आणखी वेगळा जाणून घ्यायची आवश्यकता नव्हती.

पांढरपेशे, ' बुके ' जेवढ्या हिरीरीनं काँग्रेस विरोध पुरस्कारत होते तेवढेच असे काही अन्नाडी, हॉटेलातले वेटर्स, एस्. टी. स्टँडवरचे हमाल इंदिराजींचं धडाडून समर्थन करत होते. ह्या मतांची दखल, माझ्या अंदाजात आवश्यक होती. शेवटी जे वाटलं ते असं की महाराजांची लोकप्रियता, जनसंघाचं कार्य नि चिकाटी इत्यादींमुळे शहरी विभागातनं श्री. धैर्यशीलराव पवार श्री. अण्णासाहेब कवड्यां-वर आघाडी मिळवतील तर खेड्यातनं, की जे मोर्चे बांधायचं खरं काम विरोधका-तल्या भाऊंदवरच प्रामुख्यानं आहे तेथे मात्र काँग्रेसचं निश्चित वर्चस्व राहील. खेड्यातनं होणाऱ्या मतदानावर म्हणूनच, ह्या लढतीचा निकाल अवलंबून राहील. लढत चुरशीची होणार यात शंका नाही. विजयाचं पारडं कुणीकडेही झुकलं तरी मताधिक्य दहा–बारा हजारांपेक्षा अधिक राहणार नाही हेही निश्चित.

...आणि जर इंदिराजींच्या, यशवंतरावांच्या आवाहनाचा ( धमक्यांचा ?? ) परिणाम होऊन काँग्रेस अंतर्गत विरोधी गट सध्याप्रमाणेच शेवटपर्यंत एकत्रित राहिले तर, मताधिक्याचा हा काटा काँग्रेसच्या बाजूनेच झुकण्याची शक्यताअ धिक आहे आणि राजकीय दृष्टया महाराजांचा कदाचित पराभव होऊनही, जास्तीत जास्त फायदा जनसंघ उठवणार आहे.

□ □ □

३ मार्च १९७१

# इंडिकेटला सहा जागांची अपेक्षा

'माणूस 'मधील माझ्या लेखातील इंदिरेने मोरारजींविरुद्ध केलेल्या हीन प्रचारी विधानांना कोणा पत्रलेखकाने लेखकाची विधाने समजून ज्याप्रमाणे टोले लगावले त्याप्रमाणे आज गुजराथी जनतेची परिस्थिती आहे.

आपल्याला प्रिय असलेल्या व्यक्तीविरुद्ध काहीही लिहले वा बोलले की त्या व्यक्तीपेक्षा आपल्याच भावना जास्त दुखावल्या जातात व त्यामुळे मनःक्षोभ तयार होतो. हा मनःक्षोभाचा ' टेंपो ' टिकवून धरण्याचे कार्य वृत्तपत्रांनी जर योग्य प्रकारे केले तर हा क्षोभ वाढतो व राजकारणातील धमाल वाढत रहाते.

के. के. शहांनी सरदार वल्लभभाई पटेलांविरुद्ध काही आक्षेपार्ह विधाने केली. के. के. शहांनी तर मी असे बोललोच नव्हतो असे स्पष्टीकरण देऊन टाकले. तरीही गुजराथी वृत्तपत्रांनी रोज के. के. शहाविरुद्ध काही खोडसाळ मजकूर पद्धतशीर ' feed ' करीत गेल्यामुळे गुर्जर जनता भयंकर चिडली. के. के. शहांची ठिकठिकाणी प्रेतयात्रा काढण्यात आली. त्यावरून दंगली व मारामाऱ्या झाल्या. पोलीस आले. धरपकडी झाल्या. त्याने प्रक्षोभ वाढला. पुन्हा तंग वातावरण.

बडोद्यात फत्तेसिंग महाराज हे सिंडिकेटचे उमेदवार उभे आहेत. ' महाराज ' असल्यामुळे त्यांच्याविरुद्ध कोणी निवडून येणे शक्य नाही. म्हणून इंडिकेटने आपला उमेदवार उभा केलाच नाही. पी. एस. पी. च्या उमेदवारास आपला पाठींबा जाहीर केला आहे.

या पी. एस. पी. च्या सभेची मोठी बिकट अवस्था होते. एक पी. एस. पी. वाला मला परिस्थिती समजावून सांगत होता, ' पन्नास पन्नास प्रश्न विचारतात प्रत्येक प्रचार सभेत. उत्तरे दिली तरी पंचाईत, नाही दिली तरी पंचाईत आणि गंमत ही की तेच तेच प्रश्न धाडणारे चेहरे प्रत्येक सभेत दिसतात ! '

हिंसाचाराविषयी त्याने तक्रार केली, ' सत्ता त्यांची, पोलीसही त्यांचे. दंगलीच्या निमित्ताने मुसलमानांना पकडले जाते. हे सिंडिकेटचे स्थानिक पुढारी मोठेपणा घेऊन दुसऱ्या दिवशी त्यांना स्वतः पुढाकार घेऊन सोडवून आणतात. अल्पसंख्याकांना हे नाटक आज समजत का नाही ? अशाने का मते मिळणार आहेत त्यांची ? '

मोरारजींना गुजराथेत ' बडी आघाडी ' यशस्वी होईल अशी खात्री वाटत होती. पण ती न झाल्याने त्यांच्या मनास यातना होत आहेत. लोकशाही वाचविण्यासाठी ह्या आघाडीचे राजकारण खेळले गेले. आज आम्हास वाचवा असे म्हणण्याची पाळी त्यांच्यावर आली आहे. हे सारे clash of egoes मधून निर्माण झाले.

सुरुवातीस ही बडी आघाडी यशस्वी होईल असे वाटले होते. पण आडवी आली दिल्ली व मुंबई.

दिल्लीस एकही जागा जनसंघाने सिंडीकेट कॉंग्रेसला दिली नाही. त्यावरून गरमागरमी होऊन अहमदाबादेस काय पण साऱ्या गुजराथेत आम्ही जनसंघास एकही जागा देणार नाही. असे जाहीर झाले. तरीही वसंत गजेंद्रगडकरांनी खूप ताणून बघितले. मागील आठवड्यात सुंदरसिंग भंडारींना अहमदाबादेत यावे लागले. अहमदाबाद व बडोदे येथे आमचा उमेदवार तुमच्या उमेदवारास विरोध करणार नाही असे आश्वासन त्यांनी दिले. खरं सांगायचं म्हणजे येथे जनसंघाचे काम नसल्यामुळे जनसंघाचा उमेदवार अजून पाच वर्षे येथून निवडून येणे अशक्य आहे.

मुंबईस जॉर्ज फर्नांडीसला विरोध करण्यासाठी नवल टाटा उभे आहेत. त्यांना सिंडीकेट व स्वतंत्र पक्षांनी पाठिंबा दिलेला आहे. ईशान्य मुंबईत जनसंघाने सिंडीकेटला दम भरला आहे. आमच्या उमेदवारास विरोध करण्याचे सोडा नाहीतर राजकोट येथे जनसंघ मिनू मसानींना विरोध करेल ! गुजराथ जनसंघ अशा काही आदेशाची वाटच पहात होता. मिनू मसानी संघाच्या कार्यावर निवडून आले ही सूर्यप्रकाशाइतकी स्वच्छ गोष्ट आहे. एकदा निवडून दिले म्हणून ही बैठक मसानीच्या बापाची झाली काय, असा संघाच्या कार्यकर्त्यांचा सवाल चूक नाही. राजकोट, अहमदाबाद व बडोदा येथून शिस्तपालनासाठी जनसंघाचे उमेदवार आज बाजूस हटले असले तरी त्यांनी आघाडीतल्या उमेदवारास मदत केलीच पाहिजे असे बंधन त्यांच्यावर नाही. रागावून जनसंघाने धंधुका, जुनागढ व मेहेसाणा येथे आपले उमेदवार आघाडीच्या विरुद्ध उभे केले आहेत. त्यांचे म्हणणे, स्वतंत्र-सिंडीकेटचे उमेदवार एवढे दुर्बल आहेत की ते निवडून येणे शक्यच नाही. या जनसंघ-स्वतंत्र-सिंडीकेटच्या साठमारीत इंडिकेटचे उमेदवार निवडून येण्याची शक्यता जास्त आहे.

वाजपेयजींचे एक कवन सुप्रसिद्ध आहे : 'गवा बैठे सर्वस्व, आपसमें लढकर । बुझे दीप घर घर । हुवा शून्य अंबर । निराशा निशा ने जो डेरा जमाया, ये जयचंद के द्रोह का दुष्ट फल है । जो अवतक अंधेरा, सबेरा न आया ।' हे गीत वाजपेयजींच्या भक्तांना नव्याने शिकविण्याची वेळ दुर्दैवाने आली आहे.

राजकोटची कहाणी तर मोठी दुर्दैवी आहे. तेथील जनसंघी हट्टास सिंडीकेट कॉंग्रेस कारणीभूत आहे. सुरुवातीपासून संस्था कॉंग्रेसने मोरारजीभाईंचे न ऐकण्याचे धोरण ठेवले होते. आम्ही एकटे लढू व सर्व जागा जिंकू अशी त्यांची घमेंड होती. काहीही झाले तरी जनसंघ इंडिकेटला मदत करणार नाही ही त्यांची खात्री होती. त्यामुळे मोरारजीभाईंच्या आदेशाविरुद्ध त्यांनी प्रत्येक ठिकाणी आपल्या पक्षाचाच उमेदवार पाहिजे असा हट्ट धरला.

कोणालाही न विचारता राजकोट येथे वजुभाई शहांनी संस्था कॉंग्रेसची आपली

उमेदवारी जाहीर करून टाकली. मागील खेपेस मसानी तेथून निवडून आले होते. त्यांना वजुभाई शहा म्हणाले, 'तमे जामनगर जाव !' हे कसे शक्य होते ? पुष्कळ बाचाबाची झाली. शेवटी सिंडिकेटने मसानींना सांगितले, 'तुम्ही काँग्रेसच्या तिकीटावर उभे रहा !' आगासकरांनी शिवसेनेच्या तिकीटावर उभे रहाण्यासारखे होते. पुन्हा मारामारी. शेवटी निजलिंगप्पा व बाजपेयजी यांनी दिल्लीहून आदेश दिले व मसानींचे स्थानिक विरोधक गुरगुरत बाजूस झाले ! जनसंघाने आपले तेथील सारे कार्यकर्ते काढून घेतले आहेत. ते आज जूनागढ व धुंधूका येथे काम करीत आहेत. धुंधुका येथे जनसंघाचे शंभू महाराज कोणास विरोध करीत आहेत तर स्वतंत्राच्या एच. एम. पटेलांना !

याचा अर्थ, ह्या ठिकाणी इंडिकेटचा विजय नक्की. कारण जनसंघ व स्वतंत्र–सिंडिकेट यांच्या लढ्यात कोणीही एक पक्ष जिंकेल असे वाटत नाही. हा जुगार आहे, यात इंडिकेटचा फायदा आहे असे विचारवंतांना वाटते. पण 'आज' राजकारणात विचारवंतांना स्थान आहे कुठे ?

दुसऱ्या बाजूस इंडिकेट चोवीसपैकी बावीस जागा एकट्याने लढवीत आहे.

भावनगर येथे साम्यवादी पक्षाने आपले उमेदवार उभे केले आहेत. ह्या बाईंनी आपला प्रचार कसा करावा ? सिंडिकेट काँग्रेसच्या श्रेष्ठींनी या निरुबाई पटेलांना एक पत्र लिहिले होते की, मेहेरबानी करून आपण बाजूस सरावे. या पत्राच्या फोटोस्टाट कॉपीज् बाईंनी प्रसिद्ध करून वाटल्या ! म्हणजे पुन्हा तिरंगी लढा !

इंदुचाचा याज्ञिक हे अहमदाबादेचे इंडिकेटचे अप्रत्यक्ष उमेदवार. महागुजराथच्या चळवळीचे 'हीरो.' त्यांची अहमदाबादेतील मजूरांवर जबरदस्त पकड आहे. त्यांच्या फाडकन् मुस्कटात एका स्वयंसेवकाने ठेवून दिली ! सुरतेपासून हिंसाचाराचा फायदा संस्था काँग्रेसला करून चुकलेला आहे. इंदुचाचा तर बावरून बघतच राहिले ! त्यांच्या मुस्कटात अजून कोणी मारली नव्हती. काय झाले हे त्यांना कळेचना. 'आज संघाचा हा हिंसाचार तुम्हाला आवडतो आहे, १९७२ साली हाच हिंसाचार तुम्हास भारी पडेल.' अशी प्रगट चर्चा संस्था काँग्रेसच्या गोटातून ऐकू येत आहे.

१९७२ चे कोणी पाहिले आहे, आज तर यशासाठी सारे प्रयत्न करून पहा, असा सूर संस्था काँग्रेसचा आहे.

इंदिराबाई गुजराथेत १८ व १९ तारखेस पुन्हा आल्या होत्या. त्यांनी बडोदा वगळले. जेथे यश मिळेल तेथेच भेट द्यायची असा त्यांचा बेत दिसला. त्यानुसार सिंडिकेट–स्वतंत्र–जनसंघ या आघाडीच्या सौराष्ट्रातील चार व गुजराथेतील दोन अशा सहा जागा इंदिराबाई अपेक्षितात. चोवीसात सहा म्हणजे पंचवीस टक्के ताकद झाली.

तोही गुजराथच्या बालेकिल्ल्यात ! □ □ □

 पृष्ठ १६ वरून

राष्ट्रवादी, लोकशाहीवादी आघाडी निवडायची की कम्युनिस्ट रशियाच्या हुकुमा-बरहुकूम वागणारी दुसरी आघाडी निवडायची ते ठरवा असं आवाहन आम्ही जनतेला करतो आणि ह्या संबंधात, मला वाटतं आता जनताही चांगलं काय, वाईट काय, ते समजू लागली आहे. इंदिराजींच्या फसव्या घोषणांना ती बळी पड-णार नाही ह्याविषयी मला खात्री आहे...'

नाग–विदर्भ चळवळीसंबंधी बोलताना श्री. मोतीरामजी लहाने म्हणाले, 'विद-र्भाला आमचा पाठिंबा नाही हे आम्ही वेळोवेळी स्पष्ट केलं आहे. परंतु त्याचबरो-बर महाराष्ट्रात विदर्भाला सापत्न वागणूक मिळते हेही आम्ही वेळोवेळी सांगितलं आहे आणि विदर्भाचा विकास साधण्यासाठी आम्ही प्रयत्नशील राहू असं आमचं वैदर्भीयांना आश्वासन आहे. त्यासाठी आम्ही काही सूचनाही पुढे मांडल्या आहेत. विदर्भ विकास संघाची (समिती नव्हे) स्थापना करून, विदर्भाचा १० कोटींचा बॅकलॉग विदर्भात करावयाच्या विकास–योजनांसाठी त्वरित खर्च केला जावा ह्या त्यातल्या काही प्रमुख मागण्या. ह्यामुळेच आज सत्ताधाऱ्यांविरुद्ध आकस असणारे विदर्भवादी आज आमच्याबरोबर आहेत. त्यांची जी काही केंद्रं आहेत त्यातलं अकोला हे प्रमुख आहे व इथे आम्हाला पाठिंबा आहे...'


श्री. खान मोहंमद असगर हुसेन (काँ.), श्री. मोतीरामजी लहाने (ज.), श्री. कराळे, (शे. का.) व श्री. बापूसाहेब सोहोनी (अपक्ष) ह्यांखेरीज प्राऊटिस्ट पक्षा-तर्फे एक स्त्री उमेदवार रिंगणात आहेत. पण त्यांचा खास प्रभाव काहीच पडणार नाही. काही 'हो' मतं कदाचित इकडे तिकडे होतील.

अकोल्यातल्या भेटीनंतर, मी आजूबाजूला हिंडलो. बाळापूर, कारंजा, अकोट-पर्यंत हिंडून अनेक सभांना उपस्थित राहिलो. अनेक खेडुतांना, मध्यमवर्गीयांना बोलतं केलं. एकूण ६९ नोंदी मी माझ्याजवळ करून घेतल्या. त्यांची आकडेवारी पुढीलप्रमाणे–

| | अकोला | अकोल्याबाहेर | एकूण |
|---|---|---|---|
| श्री. मोतीरामजी लहाने (जनसंघ) | १७ | १४ | ३१ |
| श्री. खान मोहंमद असगर हुसेन (नवकाँग्रेस) | १० | १३ | २३ |
| श्री. कराळे (शे. का. पक्ष) | ३ | ९ | १२ |
| मतप्रदर्शनास नकार दिला | २ | १ | ३ |
| | | | ६९ |

ह्या छोटयाशा ' सँपल सर्व्हे' ला तिथली राजकीय परिस्थिती बऱ्याच प्रमाणात हातभार लावताना मला आढळली. ह्या ६९ पैकी जेमतेम एकोणीस तथाकथित सुशिक्षित होते. बाकीचे ज्यांना ' सामान्य जनता ' म्हणता येईल अशाच प्रकारचे होते व त्यातल्या पाच स्त्रिया होत्या. मला लॉजवरून अकोला स्टेशनकडे घेऊन जाणाऱ्याचे विचार मोठे ऐकण्यासारखे आहेत. तो म्हणतो, ' ह्यानला कायले मतं द्या बाप्पा. मुनशिपालिटीत जातं तर सात पिढी खाईल एवढं कमावून राहते. पुन्ना आमच्या कामाची बात काढूनच देत नाय. ये टायमाला तर काँग्रेस विरोधीच मत आपुन देऊन टाकनार. ' दुसऱ्या एकानं काँग्रेसला शिव्या देत देत सुनावलं, ' फिर भी साला, दुसरे दिन तो इन्ही के पाँव पकडने पडते हैं । कुछ भी काम करा लेना हो तो ! यही तो बेदर्दी है और इसी लिये काँग्रेस को वोट देनेही पडते हैं ! ' अकोल्यातला व्यापारी वर्ग मात्र एकजात जनसंघाच्या मागे दिसला तर अकोटच्या एका मुसलमानानं सांगितलं, ' चाहे हमें पसंद हो या नहीं, जिस समाजमें रहना है उसीके साथ चलते रहना हमारे लिये आवश्यक है ! नहीं तो हमे जिंदा भी रहने की खात्री न रह सकेगी। हमारे गाँवके वोट काँग्रेस खिलाफ जा रहे हैं। हमेभी उन्हीकी साथ देनी पडेगी ! भले फीर हमारा वोट जनसंघको क्यों न मिले ! '

वस्तुस्थिती, निःपक्षपणे मांडलेली गणितं, माझा छोटासा सँपल सर्व्हे–सर्वच बाजूंनी जनसंघाची बाजू वरचढ भासत होती. एवढे असूनही मला तरीदेखील वाटतं की जनसंघाचं यशापयश शे. का. पक्षाला मिळणाऱ्या मतावर आणि रिपब्लिकन पक्षाची किती मतं जनसंघाला मिळतात ह्यावर अवलंबून आहे. ह्या मतांमध्ये दुसरं पारडंही जड करण्याची ताकद आहे हे विसरून चालणार नाही...



# आणखी काही जाहीरनामे

## योग्य माणूस योग्य ठिकाणी....

मंजूनाथ नायर, ठाणे

आज जी नैराश्यमय परिस्थिती निर्माण झाली आहे तिला कोण कारणीभूत आहे ? तर मी म्हणेन राज्यकर्त्या पक्षाशिवाय इतर पक्षच जबाबदार आहेत.

काही दिवसांपूर्वी पूज्य विनोबाजींनी 'Danger Ahead' या मथळ्याखाली एक लेख लिहिला होता. त्यात ते म्हणतात की, 'भारतात बरेच ईझम्स isms' आहेत. उदा. सोशलिझम, कम्युनिझम्. पण मी मात्र 'दे-ईझम'च 'Theyism' श्रेष्ठ मानतो. कारण मत दिले की आपण कृतार्थ झालो. आता आपले काहीच कर्तव्य शिल्लक राहिलेले नाही. सर्व काही ते करतील,' अशा गाफील भूमिकेत लोक राहतात,' हीच खरी शोकांतिका आहे माझ्या दृष्टीने.

सर्व सुधारणा, सुखसोयी करण्याचे आणि करवून देण्याचे कार्य त्या राज्यकर्त्या पक्षाची मिरासदारी आहे, आणि आपण त्या कार्यात वेळोवेळी लोकांच्या नजरे- समोर येण्यासाठी 'आम्हीही काही तुमच्यासाठी केले,' हे सांगण्यापुरतेच आणि घोषणा देण्यासाठीच विरोधी पक्ष आपली ताकद राबविताना आढळून येतात.

गेल्या २०-२२ वर्षांत सत्तेवर असलेला पक्ष म्हणजे काँग्रेस पक्ष. ह्या पक्षाने आपल्या गावासाठी, शहरासाठी किंवा प्रांतासाठी काही चांगल्या योजना कार्यान्वित केल्या आहेत. अमूक एक चांगले काम केले आहे असेसुद्धा किती विरोधी पक्षाच्या लोकांनी प्रामाणिकपणे आपल्या मतदारसंघात सांगितले असेल. माझ्या दृष्टोत्पत्तीस तरी आजवर अशी एकसुद्धा गोष्ट आलेली नाही. उलट चुका मात्र कुसळाच्या मुसळाएवढ्या मोठ्या करून पुन्हा पुन्हा लोकांपुढे आणल्या जातात अशी कैक उदाहरणे देता येतील.

बरे, विरोधीपक्षांपैकी कोणालाही निवडले तरी ते काय करतात ? याचा एक पुरावा मध्यप्रदेशात दिसून आला. तेथे विरोधी पक्षाचे मंत्रीमंडळ आले आणि

गडगडले. मंत्र्यांनी आपले बंगले सोडले त्या वेळी तेथील मनमानेल ते फर्निचर आणि क्रोकरीसुद्धा नेली असे त्या वेळी वृत्तपत्रातून व चौकशीतून दिसून आले तेव्हा दगडापेक्षा वीट मऊ किंवा आजच्यापेक्षा कालचा गोंधळ बरा होता असे मानून लोक पुन्हा कॉंग्रेसच निवडून देतात. विरोधी पक्षांची शोचनीय आणि दयनीय परिस्थिती पाहिली की हे योग्य वाटते !

निवडणुकीत किंवा निवडणुकीनंतर काही गैरप्रकार होतात याचीही कारणमीमांसा करायला हवी. माझ्या मते आजची निवडणूक यंत्रणाच पार बदलायला हवी. आज पैसा आणि साधने यांच्या बळावरच निवडणुका जिंकल्या जातात हे दृष्य दिसते. त्यामुळे चांगले नामवंत पुढारी, फर्डे वक्ते, अभ्यासू कार्यकर्ते, निरलस राष्ट्रवृत्ती अंगी असलेले निवडणुकीत नामोहरम होतात व पुढे बेचिराख होतात.

लोकसभेत, गोलकनाथ खटल्यातील निकाल पाहून, "घटनेतील अमुक कलमास दुरुस्ती बिल" हे केवळ कै. नाथ पै च आणू शकले. "मुंदडा प्रकरण" हे केवळ कै. फिरोज गांधी यांच्यामुळेच पुढे आले. "चिनी आक्रमणाचा धोका मला स्पष्ट दिसत आहे" हे कित्येक वर्षांपूर्वी ह. वि. कामथ यांनीच द्रष्टेपणाने सांगितले होते. "आपणही माझ्याप्रमाणेच अचकन् आणि लाँग कोट शिवावा" हे कै. पंडितजींचे आग्रहाचे म्हणणे "मला आपले धोतर बरे" असे म्हणणारे कै. शास्त्री हे एखादेच ! तद्वत्च जयंती शिपिंग कंपनीतील गैरकारभार आणि धर्म तेजा प्रकरणात पंतप्रधानांचे वस्त्रहरण मधु लिमये यांच्यामुळेच केवळ घडून आले.

तेव्हा अशांसारख्या तेजस्वी परंपरा, निरलस जागरूक राष्ट्रीय वृत्ती, कोणाचीही तमा न बाळगता, केवळ सत्यासाठी अटीतटीने झुंझणारे वक्तृत्व असणाऱ्या, कोठल्या का पक्षाचे होईना– विरोधी नेत्यांची– राष्ट्रपतींनी लोकसभेवर एका वटहुकूमान्वये निवड करावी–नेमणूक करावी !

आवश्यक सेवा 'Essential Service' म्हणून सरकारी नोकरांना संप–राजकारण आदी चळवळीस बंदी असते. तद्वत् या पुढाऱ्यांची सेवा राष्ट्रास अत्यावश्यक म्हणून या पक्षोपपक्षांच्या नेत्यांना लोकसभेच्या दावणीला राष्ट्रपतींनी किंवा पंतप्रधानांनी स्वतः बोलावून नेमणूक करावी. निवडणुकीकरता समझोता करावयास हे नेते एकत्र येतात तर अशा रीतीने एक व्हायला काय हरकत आहे ? निरंकुश राज्यकारभार स्वच्छ व्हावा हाच यामागील हेतू. या अभ्यासू नेत्यांच्या पाठीमागे निवडणुकीचे शुक्लकाष्ठ नसावे. त्यांच्या अभ्यासास योग्य वेळ आणि आवश्यक तितके स्वास्थ्य लाभावे हाच यामागचा उद्देश. आता असे कोणते नेते निवडायचे याचा ठोकळमानाने एक सर्वसाधारण नियम करण्यात यावा. हा नियम फक्त लोकसभेपुरता मर्यादित न ठेवता विधानसभेकरिताही व्हावा, यांतून एकमताने निवडलेल्या विरोधी पक्षनेत्यास पगार, मोटार, बंगला आदी सर्व सुखसोयी उपलब्ध व्हाव्यात.

अशा रीतीने विरोधी नेतृत्व एके ठिकाणी राष्ट्रकार्यास जुंपल्यामुळे विधायक कार्याची मिरासदारी राज्यकर्त्या पक्षाकडून इतरही पक्षांतून पसरून खालच्या थरापर्यंत येईल व एक नवे चैतन्य पसरेल व निवडणुकीपुरतेच पंख पसरणाऱ्या पक्षांचाही आपोआप बंदोबस्त होईल.

शेवटी असे की, अशा पोटतिडिकीने जो मतदारांकडे येईल, नेहमी त्यांच्याशी संपर्क ठेवील, ज्याला देश, धर्म, मानवता यांची चाड असेल, ज्याच्या ठिकाणी धीरोदात्त चारित्र्य, जिव्हा लालित्य, अभ्यासूवृत्ती, सेवाभावी कामसूवृत्ती आदींपैकी गुण दिसतील तेथे त्याचा पक्ष न पाहता लोकांनी त्या उमेदवारास मत द्यावे. योग्य माणूस, योग्य ठिकाणी पाठविल्याचे समाधान तरी मतदारास मिळेल. □

## मग मत द्यावयाचे तरी कुणाला ?

प्रफुल्ल कुलकर्णी, नातेपुते, जि. सोलापूर

आज तरुणांपुढे दोन पर्याय आहेत–

१. गेली तेवीस वर्षे सातत्याने चाललेल्या पक्षीय हुकूमशाहीस पुन्हा निवडून देऊन देश अस्तंगत होताना पाहणे.

२. बड्या आघाडीस मत देऊन राष्ट्रीय कर्तव्य बजावणे.

जनसंघ व त्याची बडी आघाडी यशस्वी व्हावी असे मला मनोमन वाटते. कारण त्यांनी कितीही आपापसात वैर धरले तरी दोन्ही पक्ष हिन्दुप्रेमी आहेत. मग त्यातील कोणताही एक सत्तेवर आला तरी चालेल. त्यांच्यापुढे मतदान करण्याआधी हे मुद्दे ठेवावयास हवे आहेत.

१. बडी आघाडी सत्तेवर आल्यास कम्युनिस्ट व लीगवर बंदी घातली जाईल.

२. भाषावार प्रांतरचना रद्द करून राज्यकारभारास योग्य असे विभाग पाडून केंद्रसत्तेचे प्राबल्य वाढवावे.

३. अणुबॉंबचे आश्वासन त्यांनी दिलेच आहे. शिवाय त्यांनी मुस्लिमांचे जे खास हक्क आहेत ते रद्द करून सर्व धर्मीयांसाठी एकच कायदा लागू करावा.

४. सक्तीचे लष्करी शिक्षण सर्व तरुणांना करावे.

५. आज ज्याचे त्याचे मानेवर समाजवादाचे भूत स्वार झाले आहे. त्याच्या नादी न लागता राष्ट्रीय उत्पादन वाढ करावी. या प्रकारेच सर्वांस भाकरी मिळेल.

हे सर्व करण्याचे बडी आघाडी-जनसंघवाले आश्वासन देतील तर निश्चितच सर्वांनी त्यांना डोळे झाकून मत देण्यास हरकत नाही.

□

## कायद्याची अंमलबजावणी करणारी हुकूमशाही हवी

**मेघराज गोठी, आग्रारोड, घोटी**

स्वातंत्र्याच्या २४ वर्षांच्या कालखंडात गरिबांची गरीबी, श्रीमंतांची श्रीमंती, सार्वजनिक उद्योगधंद्यातील गैरव्यवहार, लाचलुचपत, महागाई आणि पुढाऱ्यांचे सत्ताप्रेम यात विलक्षण वाढ झालेली आहे. जनतेचे दारिद्र्य व अज्ञान याचा चलाख पुढाऱ्यांनी फायदा घेऊन उत्कृष्ट भाषणबाजीने समाजवादी भारत निर्माण करण्याचे निमित्त पुढे करून स्वतःचीच सत्तास्थाने स्थिर करण्याच्या प्रयत्नांतच सदैव कार्यरत राहिले आहेत.

जनतेला आपली देशनिष्ठा व जनतेची सेवा करण्याची कळकळ स्पष्ट कळावी यासाठी आपल्या पुढाऱ्यांनी अनेक लोकहितांचे कायदे लोकसभेत पास करून घेतले. परंतु त्या कायद्यांच्या अंमलबजावणीकडे पद्धतशीरपणे दुर्लक्ष करून जनतेच्या नजरेत जनहिताची धुळ फेकण्यात आपले पुढारी यशस्वी झालेले आहेत.

कायद्याच्या अंमलबजावणीकडे जाणून बुजून दुर्लक्ष झाल्याने कायद्याचे उल्लंघन करून कष्ट न करता गैरव्यवहारांनी पैसे मिळविण्याची संधी काही समाजकंटकांना लाभल्याने देशात काळ्या पैशाचे व त्याचबरोबर लाचलुचपतीचे प्रमाण प्रमाणाबाहेर वाढले व काळ्या पैशाची वाढ प्रमाणाबाहेर झाल्यानेच अर्थव्यवस्था मोडकळीस आली आहे.

काळा पैसा व लाचलुचपतीचे प्रमाण एवढे वाढले आहे की सध्या अस्तित्वात असणाऱ्या राजकीय पक्षांपैकी एकही पक्ष त्यावर नियंत्रण ठेवू शकेल असे वाटत नाही. कारण बहुतेक राजकीय पक्षांच्या निवडणूक फंडास कित्येक समाजकंटकांच्याच पैशाचा आधार आहे. अशा परिस्थितीत कायद्याची कडक अंमलबजावणी करून काळा पैसा, लाचलुचपत व इतर गैरव्यवहारांना आळा घालून सामान्य जनतेल- किमान अन्न, वस्त्र, निवारा आणि मनस्वास्थ्य काही काळ अभिप्रेत आहे. ◻

## इंदिरावादी काँग्रेसला विजयी करा !

**मुकुंद द. कळमकर, जितूर**

भारतीय जनतेला जर केन्द्रात स्थिर व बळकट सरकार हवे असेल तर मतदारांनी इंदिरावादी कांग्रेसच्या उमेदवारांनाच निवडून द्यावे. दुसऱ्या सर्व पक्षांचे जाहीरनामे प्रसिद्ध झाले. जागा मिळविण्यासाठी काही पक्षांचे समझोते झाले. ह्या मंथनातून बडी आघाडी निर्माण झाली. परंतु ह्या आघाडीचा प्रामुख्याने एकच कार्यक्रम आहे, तो म्हणजे 'इंदिरा हटावो.' जर ह्या बड्या आघाडीची लोकसभेत

मेजॉरिटी आली तर प्रथमपासूनच पंतप्रधानपद व गृहमंत्रीपद ह्या खुर्च्यातच छाथळी होतील. एकही सरकार दीर्घकाळ टिकणार नाही व ह्या संधीचा फायदा देशद्रोही जरूर घेतील व संपूर्ण देश कलकत्ता होण्यास वेळ लागणार नाही. तेव्हा आता मतदारांनी सुज्ञपणे विचार करून बळकट सरकार प्रस्थापित करणाऱ्या इंदिरावादी कॉंग्रेसला विजयी करावे. ◻

## जनतेला स्थिरता हवी....

कमलाकर मोरेश्वर राऊत, डोंबिवली

एक राजकीय अभ्यासक म्हणून मी तर म्हणेन की जनता ही राजकारणाला विटली आहे. तिला हवी स्थिरता. याची प्रचिती केरळमध्ये आलीच. डाव्या कम्युनिस्टांच्या अतिरेकीपणाचा वीट जनतेला आला आहे! तर उजव्यांची मजबूत एकी नाही आणि म्हणून मध्यममार्गी परंतु काही तरी करावं या ध्येयाने पछाडलेली अवास्तवादी नवकाँग्रेस परवडली असा केरळने कौल दिला. मणीरामच्या जनतेने संयुक्त आघाडी हवी त्या प्रमाणात किंमत केली नाही—कारण अस्थिरतेतून अराजकतेकडे जायचे की अस्थिरतेकडून स्थिरतेकडे जायचे याचा मागोवा राजकीय पक्षविरहित जनता घेते आहे! कारण १९६७ च्या आघाडीचे राजकारण यशस्वी झाले नाही त्यामुळे आताची बडी आघाडी तरी यशस्वी होईल का, अशी शंका जनतेला आहे. परंतु सर्वसामान्य मतदारांना १९६७ च्या आघाडीतला व आजच्या बड्या आघाडीतला फरक कळत नाही. ही नवीन बडी आघाडीही जास्त संघटित, जास्त ध्येयधोरणात्मक एकतेकडे झुकणारी आहे. ती उजव्यांची आघाडी आहे. त्यात डावे संयुक्त समाजवादी असले तरी इंदिरा गांधींना हटविण्याकरिता. त्यानंतर आघाडीची आणि समाजवादांची एकी राहीलच असे नाही.

म्हणून नव्या पहिल्या मुदतपूर्व निवडणुकीने स्थिर व खंबीर सरकार येते की मुदतपूर्व निवडणुकीचे युग आणून भारताला फ्रान्सच्या मार्गाने जावयास लावणे पसंत करते हे पाहाणे आहे. ◻

## काहीही बदल होणार नाही....

रमेश सप्रे, पणजी, गोवा

पक्षांचे जाहीरनामे वाचा...त्यावरून काय दिसतं ? कोणताही पक्ष अधिकारावर आला तरी 'रामराज्य' येणारच. एक महिना थांबा...नंतर येणारा 'मेरी मंथ ऑफ मार्च' संपन्न वसंताचा अग्रदूत बनून येणारच आहे, भारताचं नंदनवन

करायला. किती इंद्रधनुष्यी स्वप्न आहे ! पण प्रत्यक्षात ते ' नाइटमेअर 'पेक्षाही भयंकर आहे.

कारण ' सापळ्यांची शहरं ' सापळ्यांचीच राहणार आहेत. झोपडपट्ट्यांत आशेचं वायुवीजन सुरू होणार नाहीयं. ' बर्थक्वेक 'च्या (Birthuqake) ह्रादऱ्यानं योजना प्रकल्पांचे इमले भुईसपाट होणार आहेत. उपाशी उदरातील भयाण पोकळीत आर्त चित्कारांचे प्रतिध्वनी घुमतच राहणार आहेत. बेकारीचा हिमालय क्षणात वितळणार नाहीय. ' प्रत्येकाच्या डोळ्यातील प्रत्येक अश्रू पुसण्याचं ' अभिवचन हवेतच बाष्पीभूत होऊन विरणार आहे.

थोडक्यात म्हणजे आहे त्या परिस्थितीत काऽऽही बदल घडणार नाही. मागील अंकावरून पुढे चालू एवढंच. काही पात्रं बदलतील...पण कथानक ? छे...त्यात बदल होईल तो नवागत पात्रांचे संवाद पाठ नसल्याने होईल तेवढाच...कालांतराने त्यांचेही चेहरे परीटघडीचे आणि मोहरे कॅलक्युलेटेड होतील आणि लोकशाहीच्या जत्राळेवर ' बहुजन हिताय, बहुजन सुखाय 'चा जप करीत बकध्यान सुरू होईल.

संपादकमहाशय, ही नतद्रष्ट्याची (Prophel of gloom) भविष्यवाणी नाही. हा पराभूतमनोवृत्तीचा उसासा नाही की निराशावादाचा हुंकार नाही. आहे फक्त हुंदका...दबलेला, अस्फुट...गुदमरलेला पण सर्वस्पर्शी...!

यातून मार्ग ? सध्याचे तथाकथित ' गिरिधारी भगवंत ' नक्कीच तो काढू शकणार नाहीत. त्यासाठी ' नव्या मनूतील गिरिधर पुतळ्या 'च्या रूपानं ईश्वरी अवतारच जन्मायला हवा...गीतेत दिलेल्या वचनाची पूर्ती करण्यासाठी... □

## काहीतरी घडायला पाहिजे....

मीननाथ जोशी, पुणे

काहीतरी घडायला पाहिजे
बंदिस्त शिकारी कुत्र्यासारखं
प्रक्षुब्ध झालेलं मन धडका मारत आहे
चाकोरीला
येरझारत आहे अधांतरात
पेटलेली युयुत्सु वृत्ती
उसासत आहे वादळासारखी
काहीतरी घडायला पाहिजे–
कर्णकर्कश भोंग्याचा आवाज
धुरासारखा बाहेर पडणारा कामगारांचा
लोंढा
यंत्रावरून फिरलेले शेवटचे हात
आता लढणार न्याय्य हक्कांसाठी
उद्या संप...
सत्याग्रह, मोर्चे, उपोषण
कदाचित् दंगल, जाळपोळ
गोळीबार, लाठीमार
भावी हुतात्म्यांची लटकणारी बेहोष प्रेते

काहीतरी घडायला पाहिजे–
काळोख हसणारी राजवट
बेकारी, चोऱ्या, खून, मारामाऱ्या
जीवघेणी भाववाढ
पदव्यांची लस टोचलेले बेकार तरुण
भूकबळी
कोणाची तरी सहकुटुंब आत्महत्या
खरोखर काहीतरी घडायलाच पाहिजे
होतं–
उगाचच भरून आलेलं आकाश
तापलेली दुबळी मनं
उगारली गेलेली शक्तिहीन मूठ–
एक नाटय सारं झूट

हसत आहेत आता चाकोरीतले गुलाम
खुशीत आहेत गिरणीमालक–तिन्ही
पाळचा चालवणारे
दुप्पट फायद्यामुळे
पुन्हा तीच राजवट, तेच राजकारण
त्याच गिरविल्या जाणाऱ्या बातम्या
बेकारी, चोऱ्या, खून, मारामाऱ्या
जीवघेणी भाववाढ
पदव्यांची लस टोचलेले बेकार तरुण
कोणाची तरी सहकुटुंब आत्महत्या
–लाखो शांतपणे वाचणारे डोळे
आणि ताल धरणाऱ्या नपुसक मुठी

□ □ □

## माणूस : मालकी व तत्संबंधित इतर तपशीलाचे निवेदन


| | |
|---|---|
| १. प्रकाशन स्थळ : | पुणे |
| २. प्रकाशन काल : | द्विसाप्ताहिक |
| ३. मुद्रक, प्रकाशक, संपादक नाव व पत्ता | श्री. ग. माजगावकर १०२५ सदाशिव, पुणे ३० |
| ४. नागरिकत्व | भारतीय |
| ५. प्रकाशन संस्थेचे नाव व तिच्या भागीदारांची नावे व पत्ते | राजहंस प्रकाशन<br>१. ब. मो. पुरंदरे १०२५ सदाशिव, पुणे ३०<br>२. श्री. ग. माजगावकर १०२५ सदाशिव, पुणे ३० |

प्रकाशकाची सही
दिनांक ३ मार्च १९७१ श्री. ग. माजगावकर

 पृष्ठ ७ वरून

प्रकारची हास्यास्पद विधाने लोक एका कानाने ऐकून दुसऱ्या कानाने सोडून देत असत. "ब्राह्मण दिसेल तेथे ठेचा" ह्या जाहीर घोषणेचे जनक रामस्वामीच ! मध्यंतरी रामस्वामी नायकरांचे गावोगावी पुतळे उभारले, त्यांची उद्घाटने मुख्यमंत्री करुणानिधींनी केली. (जिवंतपणी पुतळे उभारणे ही पद्धत म्हणजे इकडे सध्याची फॅशन आहे. उदा.– कामराज, अण्णादुराई) तर मी सांगत काय होते की, रामस्वामींच्या पुतळ्यांखाली खालील वाक्ये आहेत–" देव निर्माण करणारा एक मूर्ख तर त्यांची पूजा करणारा सात मूर्ख " त्या वेळीही खूप टीकेचं वादळ उठलं होतं. (तामीळ वाक्य-कडवुले ऊंडाकिनवन् मुट्टाल, अदै वणंगवूवन् काट्टूमरांडी ! )

वेद, पुराणे, यांच्या नावाखाली ब्राह्मण फक्त इतरांवर वर्षानुवर्षे वर्चस्व गाजवीत आले आहेत, म्हणून रामस्वामींचा त्यांच्यावर राग. पुराणे किती बोगस आहेत हे सचित्रपणे दाखविणारी मिरवणूक त्यांनी काढली. एका पोस्टरमध्ये नग्न शिव जननेंद्रिय हातात धरून, जमलेल्या स्त्रियांना 'तीर्थ' वाटत असून, त्या चाखीत आहेत असे दाखविले आहे. एकात शंकर व विष्णू–दोघेही नग्नावस्थेत–उभ्याने समसंभोग करीत असून, त्यामधून निर्माण झालेला अय्यप्पा दाखविला आहे. आपल्याकडे पंढरीच्या विठोबाला जे महत्त्व तेच इकडे व केरळात अय्यप्पाला, इतकं सांगितलं म्हणजे पुरे. तिसऱ्या पोस्टरमध्ये महाविष्णू (वराहअवतार) आणि एक नग्न स्त्री (भूमीदेवी–कारण तिचे डोके म्हणजे पृथ्वीचा गोल आहे) यांचा संभोग दाखविला असून, त्यातून निर्माण झालेला नरकासुर दाखविला आहे. हे सर्व कमी वाटले म्हणूनच की काय एका बैलगाडीत रामाचा सहा फुटी पुतळा–त्याला खेटरांचा हार घातलेला–व एकजण (सजीव मनुष्य) हाताने चप्पलचे फटके मारीत होता. मिरवणुकीस खास पोलीस बंदोबस्तही होता म्हणे. मिरवणुकीनंतर 'वर्चस्व निषेध परिषद' झाली (Hindu Supersession Eradiction Conference). तीमध्ये संमत झालेल्या अनेक ठरावांपैकी, नमुना म्हणून पाहा– 'दुसऱ्याची बायको जवळ 'ठेवणे' कायदेशीर असावे' ह्या संदर्भात स्वतः रामस्वामींची सध्याची तृतीय पत्नी त्यांच्या वयाच्या जेमतेम एक तृतीयांश वयाची आहे हे लक्षात घेण्यासारखं आहे. असो.

हे सारं रामायण घडलं २६ जानेवारीला, पण १५ फेब्रु. पर्यंत सडेतोडपणे प्रसिद्धी देण्याचे धाडस कुणा संपादकाचे झाले नाही. कारण एकच की सध्याच्या सत्तारूढ डी. एम. के. पक्षाच्या मुख्यमंत्री करुणानिधींचे रामस्वामी नायकर हे गुरू ! खरं म्हणजे DMK (द्राविड मुन्नेत्र कळघम) पक्ष, मूळ DK (द्राविड कळघम) पक्षातून फुटून निघालेला आहे. शिवाय असले प्रकार करण्याची रामस्वामींची ही काही

पहिलीच वेळ नाहीय. पूर्वी भक्तवत्सलम्, राजाजी, कामराज ह्यांच्या कॉंग्रेस राजवटीतही असे प्रकार झालेले आहेत व प्रत्येकाने सोयीस्करपणे तिकडे काणाडोळा केला होता. त्रिचनापल्लीस गणेशाची मूर्ती फोडणे, पुराणाची होळी करणे, कुंभकोणम् येथे शंकराचार्यांच्या पुतळ्याची खेटरांनी पूजा बांधणे इ. इ. त्यांनी केले आणि आता करुणानिधी हाच हवाला देऊन मोकळे झालेत. ते म्हणतात, 'दोन्ही पक्षांचा काहीही संबंध नाहीय.'–हे जणू मुलाने वडिलांचे नाते नाकारण्यासारखंच नव्हे ?

ही बातमी 'सचित्र' प्रसिद्ध करण्याचं धाडस 'तुघलक' ह्या पत्रिकाने दाखविले ! सध्याचा खप १,३०,००० प्रती ! मुखपृष्ठावर गांधी, नेहरू व अण्णादुराई मिळून स्वर्गातून अश्रू ढाळीत आहेत. पण सरकारने सर्व अंक जप्त केले. संपादक 'च्यो' यांनी (CHO) जाहीर आव्हान दिले, 'माझ्यावर ॲक्शन घेऊन तर पाहा. मिरवणूक काढणारा सुटतो न् छापणारा सापडतो !' पण जप्तीचे कारण 'वेगळेची' आहे म्हणे. त्याच अंकात सैदापेट्टै ह्या मतदारसंघात रातोरात 'निर्माण झालेल्या' झोपडपट्ट्यांचे तीन फोटो, तेथे वीज पाण्याच्या सोयी, ऐनवेळी यादीत घुसडलेली १४।१५ हजार नावे इ. इ. लेख आहे ना ? मद्रासमधील हा सर्वात मोठ्ठा मतदारसंघ–१,२२,००० मते–आणि करुणानिधी तेथूनच उभे आहेत.

रामस्वामी नायकरांचा संस्कृतचा अभ्यास दांडगा आहे. ते म्हणतात, 'मी पदरचं काय दाखवलंय ? जे तुमच्या पुराणात आहे तेच दाखवलं ना ?' आणि ते पण खोटे नाहीय. आपली पुराणे आहेतपण अशीच ! आम्हालाही ते मान्य आहे. पण लोकांचा राग आहे तो रामस्वामींच्या पोस्टर्सच्या पद्धतीवर, त्यांना पाठीशी घातल्याबद्दल करुणानिधींवर, अशांशी हातमिळवणी करण्याबद्दल इंडिकेटवर–अशी ही रागाची चढती भाजणी आहे, त्या आगीत तेल ओतले 'तुघलक' जप्तीने–च्यो कोणत्याही पक्षाचे नाहीत. पण त्यांच्या २१–२–७१ च्या सभेला ५ लाख लोक एक तासभर मंत्रमुग्ध होते ! लाचलुचपतीने आधीच खिळखिळ्या झालेल्या डीएमके पक्षाच्या लोकप्रियतेस तुफान घसरगुंडी लागलीय हे मात्र खरं !

मुंबई : गेल्या निवडणुकीचे रंग
या वेळी नाहीत.
पाचही ठिकाणी आहेत
ते अनेकरंगी सामने.

मध्य-दक्षिण मुंबई : गणाचार्य × सालेभाय कादर
आज तरी गणाचार्यांचे
पारडे जड आहे...

मध्य मुंबई : मनोहर जोशी × भंडारे
मनोहर जोशी आज लोकसभेत
गेल्यासारखीच
भाषणे करत आहेत
पण धोका वाटतो.

वायव्य मुंबई : शांती पटेल × गोखले
जुन्या काँग्रेसचा बालेकिल्ला
तरी पण चित्र गोंधळाचे.

आणि गाजणारे दोन फड

मलपृष्ठ २ वर....

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे द्विसाप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे ३० येथे छापून, १०२५ सदाशिव, पुणे ३० येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर

MANOOS (Biweekly) : 40 Paise : Regd. No. M-H 649

# आणि गाजणारे दोन फड

**दक्षिण मुंबई :** इलेक्शन कुणाचे ?
जॉर्ज ? टाटा ? डॉ. कैलास ?
का पाटील ? ?

पाटील बनासकाठ्याला गेले
तरी त्यांचा राजकीय आत्मा
अजून दक्षिण मुंबईतच रेंगाळतो आहे.
म्हणून तर टाटांची उमेदवारी नसेल ?

**ईशान्य मुंबई :** धोबीका कुत्ता, न घरका न घाटका
नेमकी हीच अवस्था आज करिअप्पांची.
जनसंघाच्या दृष्टीने मात्र
सारं आलबेल...

मुंबईतल्या ५ जागांचं चित्र आज असं आहे.

या चित्राची अधिक ओळख
यापुढील माणूस अंकी.

# मुंबई निवडणूक विशेषांक

प्रसिद्धी ६ मार्च
किंमत १ रुपया